# प्रकरण चौथे

## 'मरणकळा' व 'भटक्या' या आत्मकथनांचे अंतरंग

# प्रकरण चौथे

# 'मरणकळा' व 'भटक्या' या आत्मकथनांचे अंतरंग

**'मरणकळा' मधील गोपाळ समाज दर्शन :**

गोपाळ समाज ही भटकी जमात आहे. 'ढोल वाजती'च्या प्रारंभीच जनाबाई कचरू गिऱ्हे यांनी तसा स्पष्ट निर्देश नोंदविला आहे. लहानपणी आजीला प्रश्न विचारायचे आणि आजी सांगायची बीड जिल्ह्यात आठ दहा पालं असणारा आजोबासोबतचा गोपाळ समाज होता. ते एकमेकांचे गणगोत होते. जीवनात परवड चालूच होती. या आजीच्या सांगण्याची नोंद करताना जनाबाई गिऱ्हे लिहितात. ''पोरी, आम्हाला तीन दिसा उपर एका गावात राहायची मुभा नव्हती. ज्या गावात म्हशीला चारापाणी दिसल आणि आम्हाला घास कुटका मिळण्यासारखं गाव दिसलं ह्याच गावाजवळ पालं ठोकायची पालं उपटायचा, ठोकायचा तुझ्या आज्याला भारी क्टाळा. त्याच गावावर दोन रात्री मुक्काम करायचा आन तिसऱ्या दिवशी पुढच्या गावी जाव लागत हुतं''[१]

एका गावात तीन दिवसापेक्षा अधिक राहायचं नाही, हा या भटक्या जमातीवर व्यवस्थेने केलेला अन्याय आहे. हा सहन करीत शतकानुशतके हा समाज भटकतो आहे. बीड जिल्ह्यात आजोबा पाल घेऊन पाच पोरांना घेऊन आठ-दहा पालांच्या संगतीने भटकायचे पुढे आजोबा नंतर या कुटुंबाचा गाडा आजीने आणि नंतर वडिलांनी ओढला पण भटकणे बंद झाले नाही. स्थिरतेची अपेक्षा करायची नाही. भटकत राहायचे, म्हशी हीच संपत्ती समजून जगायचे ही गोपाळ समाजाची रीतच होऊन बसली आहे.

भीकेशिवाय उपजीविकेसाठी साधन नाही. संध्याकाळच्यावेळी लेखिकेचे आजोबा भीक मागायला जातात आणि सवर्ण त्यांना चोर म्हणून चावडीवर बांधून ठेवतात. मुल अन्नाविना झोपतात रात्री दुसरे गोपाळ येऊन गावकऱ्यांच्या हातापाया पडून सुटका करतात. चोरी न करताच असे संशयाने पाहिले जाते. तेथे लाचार होण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नसतो.

आषाढ श्रावणाच्या दिवसात तर या समाजाचे अत्यंत हाल होतात. मग हे लोक कुठे जत्रा असेल त्याठिकाणी ढोल घेऊन वाजवायला जातात. एक दिवस अन्न मिळेल ही अपेक्षा ठेवून लेखिकेचे आजोबा

जत्रा वाजवायला जातात आणि परत येताना रस्त्याने भूताला ठेवलेले तळीव पदार्थ दिसतात तेच पदार्थ अधाशासारखे खातात. तिथेच त्यांचा शेवट होतो. दुसऱ्या दिवशी ही बातमी आजीला आणि व गोपाळांना समजते. प्रेताला मूठमाती देण्यासाठी येतात तेव्हा सवर्ण लोक आपल्या गावात मूठमाती करू देत नाहीत. ते प्रेत दूर नेऊन माणसाला सुगावा न लागताच ओढ्यात पुरतात. म्हणजे या समाजाला गावात राहायला जागा नाही आणि मेल्यावर अंत्यविधीसाठीही जागा नाही अशी स्थिती या सामाजाची आहे. ''भारतीय सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा इतिहास हा स्वांतंत्र्य लढ्याच्या इतिहासापेक्षा मोठा आहे. स्वातंत्र्य मिळाले पण अनेक सामाजिक प्रश्न मात्र अजूनही सुटलेले नाहीत.''[२] हे बाबूराव बागूल यांचे मत बोलके आणि वास्तव आहे. याचा प्रत्यय या आत्मकथनात येतो. भारतात लोकशाही आली तरी माणसा सारख्या माणसाला अंत्यविधीसाठी भटकावे लागत आहे. याचा अर्थ भारतीय लोकशाही औपचारीक आहे. सामाजिक विषमता कमी झाली नाही. याला कारण या समाजाकडे नसलेले ज्ञान, अज्ञानातच तो दारिद्र्याचे लाचारीचे जीवन जगत आहे.

या भटक्या समाजाला पोटासाठी, म्हशीच्या चाऱ्यासाठी, जळणासाठी साध्यासाध्या चोऱ्या कराव्या लागतात. त्याशिवाय इलाज नसतो. लेखिकेचे वडील आणि इतर गोपाळ कणसाची चोरी करतात आणि पोलिसांची शिक्षा भोगतात. लेखिकेला डॉक्टर मोसंबी खायला सांगतात पैशाभावी वडील मोसंबीची चोरी करतात आणि रक्तबंबाळ होईपर्यंत शेतकऱ्यांचा मार घेतात. लेखिकेची चुलती जळणासाठी शेताच्या कडेची काठी उपसते त्यावरून तिच्यावर अत्याचार केला जातो. प्रतिकार करताच इतर गोपाळांना गावकरी बेदम मारतात. असा सतत मार आणि शिव्यांचा वर्षाव त्यांच्यावर होत असतो. प्रचंड दारिद्र्याची श्रीमंती असल्यामुळे अंगाला अंगभर कपडा मिळत नाही. अन्न मागून कपडे मागून ज्याचा काही उपयोग होत नाही त्याचा वापरही जमात करीत असते. लेखिकेने डी. एड. पर्यंतचे शिक्षण मागून आणलेल्या कपड्यावर केले. असे जीवनावश्यक गरजांसाठी दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. गरीब माणसाच्या जीवनात सर्वात मोठा प्रश्न हा अन्नाचा असतो. अन्नासाठी दाहीदिशा अशी त्यांची स्थिती असते. त्यासाठी तो अगतिक लाचार होतो. कारण भूक मोठी वाईट असते. पोटाचे प्रश्न सुटले की

माणसाच्या जीवनातील अर्धे प्रश्न सुटलेले असतात. गोपाळ समाजाच्या अभावग्रस्त जीवनात भूक रौद्र स्वरुपात आढळते. भुकेसाठी पोटासाठी संघर्षाचे प्रसंग मोठ्या प्रमाणात आलेले दिसतात.

**भटक्या आत्मकथनातील गोपाळ समाजदर्शन :**

गोपाळ समाज हा सतत भटकत राहणारा आहे. त्यांच्या मुलभूत गरजादेखील पूर्ण होत नाहीत यांच्या जीवनाला स्थैर्य नाही. म्हशीच्या पाठीवर बिऱ्हाड घेऊन पोट नेईल तिकडे भटकत असतात. रानच्या पाखराप्रमाणे यांचे जीवन असते. रानच्या पाखरांना निदान कोणाचा त्रास नसतो. इथ बसू नको, या झाडावरून उठ, असे म्हटले जात नाही पण तशीही सहानुभूती या लोकांच्या वाट्याला नाही. तीन दिवसापेक्षा जास्त दिवस गावात मुक्काम करायचा नाही हे आपल्या समाज व्यवस्थेने आणि वर्णव्यवस्थेने लादलेले बंधन मोडून चालत नाही. नेहमीच या व्यवस्थेच्या अंकुशाखाली त्यांना जगावे लागते. या लोकांचा व्यवसाय म्हणजे म्हशी भादरने त्याचाही योग्य मोबदला दिला जात नाही. जो मोबदला देईल तो गुमानपणे स्वीकारावा लागतो. गावच्या पाटलाच्या म्हशी विना मोबदल्यात भादरून द्याव्या लागतात. का? तर त्यांच्या गावात राहिल्यामुळे त्यातही गरमीचे दिवस, पावसाळ्याचे दिवस असले की त्यांचा व्यवसाय चालत नाही. मग यांचे खूप हाल होतात. उपासमार सहन करावी लागते. दूध विकणे, म्हशी वाट्याने घेणे, डोंबाऱ्याचे खेळ करणे, हेही करत असतात. एवढ्यावर उदरनिर्वाह भागत नसल्यामुळे भीक मागण्याशिवाय गत्यंतर नसते. भीक मागून आणलेले शिळे भाकरीचे तुकडे, आंबलेली भाजी खाऊन दिवस काढत असतात. कधी मासे पकडणे, घोरपडी पकडणे, हे करत असताना काहीवेळा प्राणास मुकावे लागते. लेखकाचे आजोबा घोरपड पकडण्यास जातात आणि काळा डोंब्या नाग चावतो तेथेच ते तडफडून मरतात. शिळ्या तुकड्याबरोबर खायला काहीच नाही म्हणून लेखक ओढ्यावर मासे, खेकडे पकडायला जातो तेंव्हा त्यांना सर्पदंश होतो. काही वेळेला कोणताच मार्ग उपलब्ध नसेल तेंव्हा ते चोरीचा अवलंब करतात. चोरी करत असताना रूप बदलून तोंडाला काळे फासून अंधाराशी झगडत, विषारी जीवजंतूशी सामना करत चोरी करतात. चोरी कशाची तर पोटासाठी लागणाऱ्या धान्याची शेतातली कणसे, शेंगा चोरणे हे करत असताना एखादवेळी प्राण गमवावा लागतो. लेखकाचे वडील आणि मामा कणसाची चोरी करायला जातात. काळोख्यारात्री विहीर न दिसल्यामुळे मामा विहीरीत पडून मरतात. डोंबाऱ्याचे कसतरीचे खेळ

करून लोकांचे मनोरंजन करायचे त्या मोबदल्यात शिळ्या भाकरी, पसा कुडता धान्य मिळेल ते घ्यायचे. हे करत असताना कोणताच विचार करत नाहीत. हातपाय मोडेल जखमा होतील याकडे त्यांचे लक्ष नसते. त्यांचे लक्ष फक्त दोन घास अन्न पोटाला कसे मिळेल. 'भटक्या'मध्ये एक प्रसंग आलेला आहे त्यातून अतिशय विदारक असे दर्शन घडते. लेखकाच्या मामाचा मुलगा शेवटच्या घटीका मोजत असताना मुलाच्या आईला कसरत करावी लागते. इकडे समाजाचे मनोरंजन तर तिकडे दु:खाचा डोंगर कोसळत असतो. विरोधभासातून त्यांच्या जगण्याची कल्पना येते. गोपाळ समाजाचा पोटाचा प्रश्न अत्यंत गहन आहे. हे भटक्या आत्मकथनाच्या अभ्यासावरून वाटते. या जमातींना स्थिरता नसल्यामुळे बारा महिने अठराकाळ भटकत राहवे लागते. या लोकांना भीक वाढण्यापेक्षा त्यांच्या हाताला काम आणि राहयला जागा मिळाली तर निश्चितपणे त्यांची शोकांतिका कमी होईल असे झाले तर समतेचे राज्य निर्माण होईल. देशाचा विकास होईल. ''आज अस्पृश्यावर अत्याचार होतात. त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांची आर्थिक दुर्बलता उपजीविकेसाठी अहंकार जोपासणाऱ्या वर्गावर त्यांना अवलंबून राहावे लागते. आजचा अस्पृश्य हा भूमिहीन आहे. शेतमजूर आहे. त्याला स्वत:चा धंदा नाही. उत्पादनाचे स्वत:चे कुठलेही साधन नाही. जोपर्यंत तो स्वत:च्या पायावर उभा राहू शकत नाही. तोपर्यंत त्याला अपरिहार्य लाचारी स्वीकारावी लागणार आहे.''[३] असे अर्जुन डांगळे म्हणतात त्यांची अस्पृश्यता संपली पाहिजे. त्याचबरोबर त्याचे दारिद्र्यही संपले पाहिजे. तरच या भटक्या समाजाला स्वातंत्र्याचा अर्थ कळेल. नाहीतर दारोदार भीक मागण्यात व्यस्त असलेला म्हणेल स्वातंत्र्य पोटासाठी काय करते? असाच प्रश्न विचारेल असेच वाटते.

गोपाळ जमातीची राहण्याची, खाण्याची अवस्था जशी बिकट तशीच वस्त्राचीही. अंगावर घालण्यासाठी कपडे तेही मागून किंवा जुनेवाल्याकडून आणलेले असतात. बहुतेक लग्नातच यांना नवीन कपडा मिळत असावा. तोही दुकानदार देईल त्याप्रमाणे घ्यायचा. गोपाळ जमातीतील हानुत्या कपड्याच्या दुकानात कपडे घेण्यासाठी जातो तो कपड्याची पंसती करत असताना बरीच कपडे पाहिली म्हणून हा चोर आहे. दुकानदार त्याला पोलिसांच्या ताब्यात देतो. त्याचा माल विकायचा असेल तर तो चोरीचा असेल म्हणून कमी दरात घेतला जातो. असे त्यांचे शोषण केले जाते. लेखकाला शाळेत जाण्यासाठी कपडे नसतात. वडील म्हणतात त्याला कपडे कुठून आणायची, पुस्तक कुठून आणायची त्यापेक्षा तो भीक

मागून तुकडे आणतो हेच वडील पंसत करतात. अत्यंत दारिद्र्यामुळे यांना शिक्षणात खूप अडचणी येत असतात. त्यामुळे ते 'शिक्षणे म्हणजे हुकणे' असा अर्थ काढून अज्ञानी राहतात. दारिद्र्यामुळे अंधारातून प्रकाशाकडे जाण्याची आव्हाने स्वीकारत नाहीत. इथेच त्यांचा विकास खुंटतो. शिक्षण नसल्यामुळे ते सवर्णाला प्रतिकार करू शकत नाहीत. थोड्याशा चुकीसाठी त्यांना शिक्षा होते. ती शिक्षा हातापाया पडत लाचार होत भोगत असतात. लेखकाचे वडील म्हशी भादरायला जातात. म्हैस हलल्यामुळे तिला जखम होते. त्यावेळी सवर्ण त्याला भरपूर मार देतो. त्याचा मोबदला तर मिळतच नाही पण त्याचे म्हशी भादरण्याचे साधन हत्यार काढून घेतले जाते. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला सीमा नसते. असे यांचे आयुष्य दु:ख, व्यथा, वेदना, लाचारीमध्ये जात असते. घर नाही त्यामुळे स्थैर्य नाही. पोटाची आग संपत नाही. समाजाचा अत्याचार संपत नाही. तरीही त्यांनी बिनबोभाट जगायचे, अन्यायाला शरण जायचे आणि अत्याचार सहन करायचा, हीच त्यांची जगण्याची रीत होऊन बसली आहे. ह्याचे यथार्थ दर्शन 'भटक्या' या आत्मकथनातून प्रकट झाले आहे.

**'मरणकळा' मधील धार्मिक जीवन प्रथा आणि अंधश्रद्धा :**

गोपाळ समाजामध्ये कमालीचे मागासलेपण आहे. या जातीमध्ये काही उपास्य दैवते आहेत. सकलादीबाबा, मढीचे दैवत, म्हवटची देवी इ. यांच्यात दसरा सण धुमधडाक्यात साजरा करतात. दसऱ्याला देवीचा घट बसवतात. घरातील मोठी व्यक्ती नऊ दिवस उपवास करते. नवव्या दिवशी घट उठवतात. घट उठविण्यासाठी बोकड कापतात. बोकडाचे रक्त घटावर, देवीवर शिंपडतात. देवीपुढे चार पाय मुंडी ठेवतात. देवीची पुजा करण्यासाठी पतिपत्नीची जोडी असावी लागते. पालापासून थोडे दूर पाच दगड मांडतात. धोतराचे छत्र धरून पती-पत्नी पूजेचे ताट घेऊन जातात. एरंडाच्या काठीला चिंध्या गुंडाळून ते तेलात भिजवून त्याचा टेंभा करतात. तो टेंभा लहान मुलांच्या हातात देतात. गाणे म्हणत ढोल वाजवत पालावर येतात. पालावर तांब्या त्यात पाणी,नारळ, पाने ठेवतात. तो तांब्या मुलीच्या डोक्यावर ठेवतात. पूजा करून आलेली पती-पत्नी मुलीला देवी समजतात. तिला विचारतात. लेखिका सांगते "आई पावली का? कुटून आली आनं कुठ चाल्ली? वऱ्हालाकडून आले, आन खाल्लाकडं चाल्ली? शितलंक? हाव"[४] असे यथासांग विधी करतात. लोक रात्री दारू पिऊन बोकडाच्या जेवणावर ताव

मारतात. यात्रा उत्सव प्रसंगी हे लोक मनमुराद आणि भरपूर जेवतात. इतरवेळी त्यांना चवीचे आणि भरपूर अन्न मिळतच नाही. गोपाळ जमातीत मुलगा जन्मला तर पाचवी करण्याची प्रथा आहे. त्यासाठी ते बकरा कापतात. एक गोपाळीन बाळंतीण होते आणि सर्वांना पाचवीच्या विधीची काळजी लागते. भीकेवरच जीवन आणि बकरा कोठून आणायचा यासाठी चोरी करतात आणि सवर्णांचा मार घेतात. गोपाळ जमातीत विधीला फार महत्व असते. त्यावेळी ते कोणताच विचार करत नाहीत. विधी करणे एवढेच त्यांना माहित असते. ते उद्याची काळजी करत नाहीत. चोरीचा काय परिणाम होईल याचा विचार त्यांच्या गावी नसतो. त्यामुळे मानाचे जीवन कसे असते हे त्यांना माहितच नाही त्यामुळे सवर्ण त्यांना पशुपातळीवरील वागणूक देत असावा. यातून सुटका व्हायची असेल तर शिक्षण घेतले पाहिजे त्याशिवाय त्यांना जीवनाचे महत्व कळणार नाही.

घरातील व्यक्ती आजारी पडली तर नवस बोलतात. लेखिकेची आजी आजारी पडते आणि आजोबा म्हवट्याच्या देवीला बोकड कापण्याचा नवस करतात. तोपूर्ण करतात. देवावर त्यांची श्रद्धा असते. यासाठी ऋण काढावे लागले तरी यथासांग करताना दिसतात. अंधश्रद्धेत गुरफटलेला असल्यामुळे मागासलेपण अधिकच वाढते.

गोपाळ जमातीत अंधश्रद्धेचे प्रमाण विपुल आहे. भूतपिशाच्यावर त्यांचा विश्वास आहे. 'मरणकळा'त भूतपिशाच्याचे बरेच प्रसंग आलेले आहेत. लेखिकेचे आजोबा आणि काका पारवे पाडायला रात्री जातात. त्यांना पारवे सापडत नाहीत पण तेथे पांढराशुभ्र बैल दिसतो. तिथून पुढे येतात आणि एक बकरा दिसतो. बकऱ्याला आजोबा उचलून खांद्यावर घेतात. बकऱ्याचे पाय लांबतात त्याला ते भूत समजातत.लेखिकेचे वडील एकदा आमवस्येदिवशी नदीवर म्हशी पाण्यावर नेतात. तेथे आई भाकरी घेऊन येते. त्यांना खळखळ असा आवाज व उदबत्तीचा वास येतो. म्हणून वडिलांच्या मनात शंका येते. इथे काहीतरी भूतपिशाच्च असावे. ते लगेच म्हशी घेऊन दावणीला बांधतात तर म्हैस दावणीला चक्रा मारत फिरते. घरी पत्नी तोंड वाकडे करून वेड्यासारखी करते. तेव्हा ते मांत्रिकाकडे जातात. तो 'सातीआसरा लागल्याचे सांगतो' त्यासाठी लेखिकेचे वडील ऋण काढून खाजे देण्याचा विधी करतात. काही गोपाळ रात्री पारवे पकडायला जातात. येताना त्यांना रस्ताच सापडेना. रात्रभर हिंडतात शेवटी वाट

पाहून आजीने ढोल वाजवायला सांगितला. ढोलाच्या आवाजाच्या दिशेने ते येतात. गोपाळांनी पालं जांभळीच्या झाडाखाली उतरली आणि गावकऱ्यांनी सांगितले झाडावर खवीस आहे. धोका आहे. लेखिकेच्या आजीने त्याचा निखारा पेटवून बंदोबस्त केला. इथून पुढे आजीची ख्याती पसरली. लेखिका लिहिते. ''गोपाळाच्या पालावर म्हातारी गोपाळीन लई जल्लाद देवलाशीन हाय...'' खरं तर आजीला कायबी येत नव्हतं.''[५] याबातीत काही एक न येणाऱ्या आजीला भूताचा बंदोबस्त येतो. म्हणून लोक येऊ लागले. आणि घरात खाण्याची सोय झाली. भूताला दिलेली बिडीकाडी वस्तू मिळू लागल्या, असे लेखिका म्हणते. खरे तर मनामध्ये भीती आली की कोणत्याही प्रतिमा डोळ्यासमोर येत असाव्यात लोकांच्या या समजूती असतात. आमवस्येच्या रात्री भूते फिरतात. नदीवर साती आसरा असतात. जेथे माणूस नसेल तेथे भूतपिशाच्च असते. भूताचे पाय उलटे असतात. त्यांना दिसत नाही. भूतपिशाच्चाची निर्मिती माणसाची इच्छा अपुरी राहील की ती भूते होतात. अशी समजूत असते. वास्तविकपणे विचार केला तर कोणालाच मरावे वाटत नाही. जगण्यासाठी तो कितीतरी धडपड करत असतो. मग सर्वांच्याच इच्छा अपुऱ्या असतात. मग भुतांचेच राज्य निर्माण झाले असते. याला वस्तुस्थितीचा पुरावा नाही, ही समजूत असते. भूतपिशाच्याची निर्मिती अज्ञानातून होत असते. अज्ञानामुळेच मनात शंका घेऊन त्याचे खर्चिक विधी करत असतात. त्यामुळे अंधश्रध्दाळू माणसे कायम दारिद्र्यात जीवन जगत असतात.

गोपाळांच्या जातपंचायतीचे स्वरूप मोठे विलक्षण आहे. उत्सव, सण, यात्रा यावेळी जातपंचायतीची बैठक असते. त्याठिकाणी न्यायनिवाडा केला जातो. जातपंचायतीसमोर गुन्हे, प्रकरणे खटला मांडतात. 'मरणकळा'मध्ये लेखिकेचे प्रकरण आलेले आहे. लेखिकेचे वडील लेखिकेला शिक्षण शिकवतात हे जातपंचायतीच्या नियमामध्ये बसत नाही. मुलीला शाळेतून काढण्यासाठी लेखिकेच्या वडिलांशी झगडत असतात. मुलीला शाळेतून काढण्यास नकार दिल्यामुळे त्यांचे पाल वेगळे टाकले जाते. मुलीने शहरात शिकणे त्यांना मान्य नाही. मुलीने दारोदार फाटक्या चिंध्या घालून भीक मागितलेली मान्य असते. पण स्वाभिमानाने जगणे मान्य नाही. लाचारीने जगणे, दुसऱ्यावर अवलंबून राहणे यातच ते मोठेपणा, धन्यता मानतात. मुलाने शिकले तर चालते पण मुलीने शिकलेले चालत नाही. अशी विषम न्याय देण्याची पद्धत असते. मुलीने शिकणे म्हणजे जातीला कलंक लावणे, कोल्हाटीन होणे अशी समजूत

असते. समाजातील जातपंचायतचे हे निवाडे आणि त्यांचे पालन करणारे गोपाळ वर्तमानाला समजून घेऊ शकत नाहीत. जातपंचायतीचे या जमातीवर प्रभुत्व आहे. नानाविध अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचे प्राबल्य असते. यामुळे ही जमात अजूनही भटक्या लाचार दरिद्री जीवनातून वर येत नाही. खरे तर प्रत्येक मुलीने शिकले पाहिजे. कोणत्याही भटक्या जमातीचे निरीक्षण केले तर पुरूष व्यसनाधीन असलेले दिसतात. त्यामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी स्त्रीवर पडत असते. स्त्री भीक मागून कुटुंब सांभाळण्याचा प्रयत्न करत असते. त्या जर सुशिक्षित झाल्या असत्या तर त्याचे त्यांना वेळोवेळी भान येत राहील. ती लाचारी जीवनाचा त्याग करेल. स्वाभीमानाने जगण्याचा प्रयत्न करेल निदान पुढील पिढी तरी सुधारेल. व्यसनाला आळा बसेल. त्यासाठी ीक्षण घेतले पाहिजे. लेखिका एक परिवर्तनाची पाऊल खूण आहे. थोडासा बदल होत आहे असे जाणवते.

**'भटक्या' मधील धार्मिक जीवन प्रथा आणि अंधश्रद्धा :**

गोपाळ जमात रानावनात फिरत असते. त्यांची काही उपास्य दैवते आहेत. बीड जिल्ह्यातील सकलादी पिर, सैलानीबाबा मढीचे दैवत हे लोक सकलादी पिराच्या जत्रेला जातात. भक्तीभावाने पूजा करतात. मलिदयाचा नैवद्य दाखवतात. घरामध्ये कोणी आजारी पडले की, लगेच या देवांना नवस बोलतात. लेखकाचे वडील आजारी पडतात, तेव्हा लेखकाची आईवडिलांना घेऊन सकलादी पिराला जाते. जीवाला जीव देण्याचा नवस करते. यश मिळण्यासाठी नवस बोलतात. पोराबाळांना सुख लागू दे म्हणून देवाची जत्रा करतात. मुलबाळ होत नाही, मुलांना आजार होऊ नये यासाठी नेहमी नवस बोलत असतात. सतत नवस करणे आणि तो फेडणे यात त्यांचा बराच वेळ, पैसा खर्च होत असतो. लेखकाची आई आजारी पडते तेव्हा लेखक आणि त्यांची आई सैलानीबाला खेटे घालतात. लेखकाला सर्पदंश होतो तेव्हा त्यांचे आईवडील भैरवनाथाचा धावा करतात. त्यांना मारुतीच्या मंदिरात ठेवतात. थोडीही शंका आली की देवाच्या पाठीमागे लागतात. उपासपोटी राहून देवाचे यथासांग विधी करतात. प्रचंड अज्ञानामुळे अंधश्रद्धेत बुडून जातात. भूत पिशाच्चावर प्रचंड विश्वास आहे.

**'मरणकळा' मधील लग्न पद्धती :**

गोपाळ समाजात विवाहाला अत्यंत पवित्र असे स्थान दिलेले असते. लग्नसोहळा तीन दिवस चालतो. या तीन दिवसाला एक वेगळे महत्व असते. गोपाळ जमातीत लग्न ठरले की मुलीचा साखरपुडा केला जातो. लग्न मुलाच्या किंवा मुलीच्या दारात असतात. बंधन नसते.लग्नामध्ये शक्यतो झाडाच्या पाल्याचा मांडव घालतात. लग्नाचे एकूण विधी तीन दिवस चालतात. पहिला दिवस हळदीचा असतो. या दिवशी हळदीचा बकरा कापला जातो आणि जेवण दिले जाते. लग्नाच्या पहिल्या दिवशीच मान ठरला जातो. लग्न दीडात करायचे की तीनात ते ठरवतात. हा मान पंच ठरवतात त्याला 'कुंकू वर्तविणे' असे म्हणतात. हळद लावताना गोपाळ जातीच्या स्त्रिया गाणी म्हणतात. गोष्टी सांगतात. दुसऱ्या दिवशी लग्न होते. गोडवे जेवण दिले जाते. त्यातच 'फळ' हा कार्यक्रम असतो. फळ म्हणजे जातपंचायत बसते त्यावेळी वधूवरांकडून प्रत्येकी २५ रुपये घेतले जातात. या पन्नास रुपयांना महत्व आहे. लग्नाला आलेल्या लोकांची आणि त्यांच्या गावाची यादी तयार केली जाती. वधूवराकडून घेतलेले पन्नास रुपये वाटले जातात. एक रुपया मिळेपर्यंत कोणीही व्यक्ती मांडवाबाहेर जात नाही. रुपया न घेता मांडवातून बाहेर गेले, तर ती व्यक्ती जातीबहिष्कृत आहे, असे समजले जाते. अशा माणसाला या समाजात 'पावली बंद इसम' म्हणून ओळखले जाते. पावली बंद होणे या समाजात अप्रतिष्ठीत समजले जाते. कितीही श्रीमंत अगर प्रतिष्ठीत व्यक्ती असली तरी आणि पावली बंद केले असेल तर या समाजातला माणूस त्या माणसाला कवडीची किंमत देत नाही. त्यांच्या लग्नकार्यात अथवा कोणत्याही कार्यक्रमास जात नाही. याला 'फळ' असे म्हणतात. लग्नात काहीवेळा मुलीच्या वडिलांकडून सोन आणि म्हशी देण्याची प्रथा आहे. सवर्णांच्या विवाहाप्रमाणे असतात एकमात्र यामध्ये फरक आहे तो जात पंचायतीचे प्राबल्य प्रचंड असते. जात पंचायतीपुढे माणसाची किंमत शून्य होते.

गोपाळ जमातीत मुलामुलींची लग्न लहान वयातच करतात. परंतु जनाबाई शिकत असल्यामुळे तिचे वडील लग्न करत नाहीत. त्यामुळे गोपाळ लोक तिला नाव ठेवत. ती मोठी असल्यामुळे त्यातही शिकलेली असल्यामुळे इतर गोपाळ कसलेही स्थळ सुचवू लागले. तेव्हा लेखिकेचे वडील व लेखिका अस्वस्थ होत अशा परिस्थितीत औरंगाबादचे स्थळ येते. लग्न ठरते. ठरल्यानंतर वर्षभराने लग्न होते.

त्यावेळीही तिच्या वडिलांना मन अस्वस्थ करणारे असे काही बोलले जात असे. लग्नाची तिथी धरली, सर्व तयारी झाली, अर्धी वऱ्हाड मंडळी येतात. नवरा मुलगाच येत नाही. नवऱ्या मुलाला एका गोपाळाने अडविले आणि माझ्या मुलीबरोबर लग्न कर अंगठी म्हशी देतो असे म्हणून म्हणून लागला पण नवऱ्या मुलाने न ऐकल्यामुळे तिथून तशी कशी तरी सुटका करून लग्नी घरी रात्री उशीरा येतात. मुलगा येईपर्यंत वडील चिंतेत होते. मुलगा आल्यावर हळदीचा बोकड कापतात लग्नाचे विधी होतात. एकमेकांविषयी वाईट वृत्ती असल्याचे जाणवते. इथे जनाबाईच्या वडिलांनी सर्वच अन्यायकारक बंधने झुगारलेली दिसतात. लेखिकेचे वडीलच हुशार बुद्धिमान सोशिक विचारी व्यक्तीमत्व म्हणून उठून दिसतात.

**'भटक्या' मधील लग्न पद्धती :**

कचरू गिऱ्हे गोपाळ जमातीतील आहेत, त्यामुळे 'मरणकळा' 'भटक्या' मधील लग्न पद्धती एकच आहेत. तरीही व्यक्ती परत्वे परिस्थितीनुसार त्यांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते. लेखकही शिक्षण घेत असल्यामुळे लग्न लवकर करत नाही. जातपंचायतीच्या बैठकीला नकार देतो म्हणून त्यांचे पाल वेगळे टाकले जाते. याची बिडी काडी बंद केली जाते. पुढे एका गोपाळाच्या मदतीने लेखक स्वतःच लग्न ठरवतात पंचाना न नेताच तीनात लग्न ठरवतात. त्यामुळे सर्वच गोपाळ भांडायला लागतात. त्यातच शिकलेली मुलगी असल्यामुळे काहीही अपमानित बोलतात शंका उपस्थित करतात लग्नाला आम्ही येणार नाही म्हणतात. "मेला तू आजच जातीला"[६] पण लेखकाचा निर्णय ठाम होता त्यामुळे काही गोपाळ जाऊन चौकशी करतात, ती गोपाळाचीच मुलगी आहे का? सत्य समजल्यानंतर मुलीच्या वडिलांच्या घरी जेवण करतात. नंतर लेखकाची आई मुलगी पहायला जाते आणि साखरपुडाच करून येते तेव्हाही गोपाळ शिकलेल्या मुलीवरून तिला म्हणतात, "कशाली टाळाटिळा केला? आता लगीन झाल्यावर तुम्हाला जातीभाईर टाकत्याल गोपाळ, पण मायबी डगमगत न्वहती."[७] लग्नाच्यावेळी खडेवाडीचे व नक्षत्रवाडीचे गोपाळ लग्नाला यायला तयार झाले. लग्नाची तयारी झाली नि लग्न तिनात म्हटल्यावर वराच्या हातात दोन रुपये आणि वधूच्या हातात एक रुपया यावरून मुलीचे मामा, आजोबा मांडवातून मानपानावरून पळू लागले. हे पाहून दोन्ही बाजूचे गोपाळ हासत होते. तडजोड करून लग्न

झाले. येथे जाती जातीतच एकमेकांविषयी वाईट प्रवृत्ती असल्याचे जाणवते. जातपंचायतीचे वर्चस्व असल्याचे जाणवते. तसेच जातपंचायतीचे वर्चस्व कमी करण्याचा नाकारल्याचे जाणवते.

**जातपंचायत :**

गोपाळांची स्वत:ची जातपंचायत असते. ती आजही अस्तित्वात आहे. समाजातील अंतर्गत कलह, विवाह प्रमुख विधी यात पंचायतीचा सहभाग असतो. पंचायतीच्या प्रमुखास या समाजात 'पाटील' या नावाने ओळखले जाते. पंचायतीचे प्रमुखपद हे परंपरेने चालत आलेले आहे. विशेषत: 'गव्हाण' आडनावाच्या कुटुंबात हे प्रमुखपद दिले जाते. पंचायतीचे अलिखित नियम हे समाजातील सर्व लोकांवर बंधनकारक असतात.

गोपाळांची जातपंचायती बैठक बोलावणे म्हणजे पंचायतीसाठी जमणाऱ्या सर्वांच्या खाण्यापिण्याचा खर्च वादी-प्रतिवादींना करावा लागतो. भटक्यामध्ये अशीच जातपंचायतीची बैठक बसली होती. त्यातील वादी पंचायतीला म्हणाला, "बायको आझाद करतो काडीमोड द्या"[८] तो सांगतो "ही वागायला चांगली नाही. व्याभीचारी आहे". तेव्हा ती सांगते, "याला कामधंदा नको फक्त खायला हवे". "कमून आण म्हणतुया माहा नवरा मानसात नाय"[९] आणि मग निकाल मुलाच्या बाजूने लागतो मुलगी वेडी होते असा जात पंचायतीचा अजब न्याय असतो.

गोपाळ जमातीतील जातपंचायतीची वैशिष्ट्यपूर्ण प्रथा आहे. लेखकाचे वडील सुकाऱ्याला आजारपणात त्यांचा मृत्यू होतो. तिथच मुठमाती द्यायचे ठरते. सगळे गोपाळ जमा होतात. पण प्रेताला कुणीच हात लावायला तयार होत नाहीत; कारण त्यांच्यात चांदीच्या वस्ताऱ्याने दाढी उतरावी लागते. ती दारिद्र्यामुळे उतरली गेली नाही. त्यामुळे प्रेताला हात लावला जात नाही. शेवटी लेखकाची आई सर्व गोपाळांच्या हातापाया पडते तेंव्हा त्यातला एक पंच उठून म्हणतो, "वंकऱ्याची दाढी केली न्हाय त्या बदल्यात दोन दिवस घालावी लागत्याल. हा मंजूर"[१०] आईने कबुल केल लेखक म्हणतो, "जिथं खायला पैसा न्हाय, तिथं दोन दिस घालायचे? आमच्या या दु:खाच्या डोंगराला ते टिकावाचे घाव घालीत हुते. गरिबीची जाण धरीत नव्हते."[११] अशी ही जातपंचायत परिस्थितीचा वेळेचा विचार करणारी नाही. गहू आणि हुलगे यांना एकाच मूल्यात मोजणारी आहे. गरीबीच्या असहाय्यतेचा विचार करणारी नाही

न्यायदेवता ही संजीवनी असते. खचणाऱ्याला, कोसळणाऱ्याला परिस्थितीचा विचार करून आधार देत असते. पण यांच्या जातपंचायतीत अनिष्ठ, कठोर प्रथा आहेत. त्यामुळे जात पंचायत म्हणजे माणुसकीहीन प्रथा आहे. पूर्व नियमावर आधारीत अनिष्ठ व्यवस्था आहे असेच वाटते.

गोपाळ जमातीमध्ये मृताला पुरण्याची प्रथा आहे. पुरण्यासाठी खड्डा खणतात तो खड्डा भरभर खंदला जात नसेल, तर मृत व्यक्तीची संसाराची इच्छा अपूर्ण आहे, असा त्यांचा समज असतो. मृत व्यक्तीला नेतेवेळी नवीन कपडे घालतात. आणि पुरण्यापूर्वी सर्व कपडे काढून घेतली जातात. 'येण वस्त्रहीन तसं जाणं वस्त्रहीन' अशी त्यांची समजूत आहे. तिसऱ्या दिवशी बकरा कापतात. त्याचा नैवद्य मातीच्या ठिकाणी दाखवितात. सगळे गोपाळ त्या मातीला हात लावतात. मृत व्यक्तीच्या मुलाच्या डोक्यावर पाण्याने भरलेली मातीची घागर देतात गोपाळ लोक त्या घागरीला खडे मारतात. खडे मारून छिद्र पाडतात. त्यातून पाणी झिरपते. झिरपणारी घागर घेऊन सात फेऱ्या मारल्या जातात. ते मातीचे मडके फोडले जाते. कारण त्या घागरीत होला पाणी पिला तर मृत व्यक्तीस शांती लाभत नाही असा त्यांचा समज असतो. मातीच्या ठिकाणी खूण म्हणून दगड ठेवतात गोपाळ जमातीला बकऱ्याचे जेवण व दारू दिली जाते. असा मर्तिकाचा विधी असतो पूजाविधीमध्ये जातपंचायतीमध्ये लग्न प्रसंगी दारूला विशेष महत्व दिले जाते.

**मरणकळा व भटक्या मधील स्त्री जीवन :**

कोणत्याही मनुष्य समूहात स्त्री हा एक अविभाज्य घटक असते. त्या समूहाच्या प्रगतीत तिचा महत्वपूर्ण सहभाग असतो. तरीही मानवाच्या इतिहासात स्त्री सदैव कष्टकरी, असह्य व गुलाम राहात आली आहे. भयाणभूत शारीरिक श्रमाने वाकलेल्या भटक्या गोपाळ जमातीतील स्त्रियांचे जीवन 'मरणकळा' आत्मकथनात प्रसंगाच्या अनुषंगाने आले आहे. आजी, आई, चुलती, सासू व स्वत: लेखिका यांच्या जीवनाचा वेध लेखिकेने घेतला आहे. या सर्व स्त्रिया कष्टाळू सांसारिक आहेत. पतिनिष्ठा आणि कुटुंबप्रेम हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष कष्ट करण्याची जन्मजात सवय असल्याने वैधव्यातही ती डगमगत नाही. लेखिकेची आजी पतीच्या मागे हिंमतीने पाच मुलांचा सांभाळ करते. त्यांची लग्ने करून त्यांना संसाराला लावते. आजीप्रमाणेच सासूही पती निधनानंतर सांभाळ करते. त्यांचे धैर्य कष्ट हे

वाखणण्यासारखे आहे. वाट्याला अफाट दारिद्र्य. अनेक संकटांना तोंड देत ते जीवन जगत असतात. लेखिकेची आई चुलती यांनाही कष्ट करावे लागते. भाकरीसाठी जीवन आवश्यक गोष्टीसाठी सवर्णाचा मार घेणे नित्याचेच असते. लेखिकेने संसाराचे केलेले वर्णन मोठे विलक्षण आहे. "कटलल्या भगून त्यावर झाकायची ताटली तीही चेपलेली धुराने काळीकुट झालेली अशाही दारिद्र्याच्या अवस्थेत जीवन जगत असतात.

गोपाळ जमातीतील स्त्री दु:ख दारिद्र्य, अज्ञान व भटकंती यांच्या चक्रव्यूहात सापडलेली, जगण्यासाठी असह्यपणे धडपड करणारी, तिच्या धैर्याला तोड नाही. कष्टाला तुलना नाही, तरीही समाजाने तिला उपेक्षित ठेवली आहे. लेखिकेने 'स्व' चे व इतर स्त्रियांचे दु:ख जगापुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तो अपूर्ण असेल कारण घटना प्रसंगाच्या निमित्ताने स्त्रियाच्या जीवनाचा वेध घेतला आहे. तरीही तो वास्तवदर्शी व दाहक अनुभवांनी परिपूर्ण असा आहे.

'भटक्या' आत्मकथनामधील स्त्री व्यक्तिरेखा म्हणजे लेखकाची आई, पत्नी, सारजामामी या आलेल्या आहेत. गोपाळ जमातीतील स्त्री प्रतिमा सोशिक स्वरूपात व्यक्त झालेली आहे. ती खूप कष्टाळू आहे. दु:खात सुख मानणारी आहे. भीक मागून संसाराला हातभार लावणे, शेतात कष्ट करणे, कसरतीचे खेळ करणे, स्वयंपाक करणे, अशी लहानमोठी कामे करताना दिसते. कितीही कष्ट पडले, पोटाला अन्न मिळाले नाही, तरीही ती तक्रार करताना दिसत नाही. लेखक सांगतो "आमी कसंबसं भाकरी खाल्ल्या, मायनं घोरपडीचा रसा पिला. माय तशीच झोपी गेली."[१२] मुलाने शिकले पाहिजे ही तिची इच्छा त्यासाठी पतीचा मार घेते पण मुलाला शिक्षणासाठी प्रोत्साहन देते. पुढे वडील वारल्यानंतर लेखकाला शाळा सोडून जनावरे राखावीत वाटतात आणि पोट भरावे वाटते पण लेखकाची आई त्याच्यात स्फुल्लींग निर्माण करते. "तू शाळा नगं सोडू जातीन दिस निघून"[१३] मुलाच्या शिक्षणासाठी पडेल ते कष्ट करण्याची तिची तयारी आहे. पहाटे लवकर उठून दूध विकणे, शिंदुळ्या गोळा करणे, शेतात काम करणे या तिच्या कष्टाला सीमा नाही. लेखक आणि लेखकाची आई रात्री तीन चाराच्या सुमारास स्टेशनवर दूध विकायला जातात. एक दिवस प्राणावर बेतणारा प्रसंग येतो. नदीला पूर आलेला अंधाऱ्या रात्री पाण्याची पातळी न समजल्यामुळे ते

वाहत जातात. लव्हाळ्याच्या साहाय्याने ते वाचतात. पतीच्या निधनानंतर तिने आईवडिलांच्या दोन्ही भूमिका नेकीने सांभाळल्या.

लेखकाची पत्नी सोशिक, समंजस, कष्टाळू. येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाणारी आहे. ढासळत्या परिस्थितीत पतीला आधार देण्याचे काम ती करीत आहे. आई पत्नी या व्यक्तिरेखा आशावादी आहेत. त्यामुळेच तिने जातीचा विरोध असतानाही शिकलेली सून केली. आई ही पहिली गुरू असते ही उक्ती येथे सार्थ वाटते नाही तर इतर गोपाळाप्रमाणेच कचरू गिऱ्हेंना जीवन जगावे लागले असते.

**लेखिकेचे वैवाहिक जीवन :**

लेखिकेचे बालपण भीक मागण्यात आणि शिक्षण घेते म्हणून गोपाळ जमातीकडून निंदा करून घेण्यात गेले. शिक्षण घेते म्हणून जात पंचायत आणि इतर गोपाळ यांनी लेखिकेला आणि तिच्या वडिलांना धारेवर धरले होते. त्यांना अतोनात त्रास देत होते. कुचकट बोलणे तर सतत चालू होते. लग्न झाल्यानंतर या त्रासापासून आपली मुक्तता होईल ही लेखिकेची समजूत लग्न ठरले आणि वऱ्हाड लग्नाला आल्यापासून निंदेला प्रारंभ झाला. खेड्यांच्या गोपाळीनीने वऱ्हाडात आलेल्या गोपाळणीला तिच्याविषयी सांगायला सुरूवात केली. ती आईच्या पोटी एकटीच आहे. तिलाही मूलं होणार नाहीत. स्त्रियांचे मन हळवे असते, काही एक सांगितले की, त्यावर त्या विश्वास ठेवतात. मनामध्ये चिंता व्यक्त करतात. रोगाला आणि भांडणाला आमंत्रण देतात. सासू हे गाऱ्हाणे ऐकताच अस्वस्थ होते आणि सकलादीबाबाला लगेच नवस बोलते ! 'माझ्या मुलाच पोटपाणी पिकू दे. त्यातच भर म्हणून लेखिका मंगळसूत्रावरून चिडते त्यावरून सगळीच वऱ्हाडी मंडळी म्हणतात की ही शिकलेली पोर नांदती का? पोरानं काही चांगलं केल नाही.

सासरच्या गोपाळ जमातीतील लोकांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगला नव्हता. कारण लेखिकेच्या पतीने त्यांच्या मुलींना नकार दिला होता. जातपंचायतीची बैठक नाकारली होती. पंचांना सोबत न घेताच लग्न ठरविले होते. हा सगळा राग तिची निंदा करण्यात व्यक्त केला जात असे. एकदा लेखिकेने आपल्या मुलाला त्रास देतो म्हणून मारले नि सासूने त्याचा वेगळाच अर्थ लावून लेखिकेच्या पतीला काही काही सांगितले. त्यावरून पतीने भांडण केले. घर सोडून निघून जाण्यास सांगितले. त्यावेळी

सर्व गोपाळ कानात तेल घालून ऐकत होते. यांचा संसार उध्वस्त केव्हा होतो याची वाट पहात होते. पण लेखिकेने पतीला उत्तर दिले, ते मार्मिक आहे. मी जाण्यासाठी लग्न केले नाही मी जाणार नाही' पतीने मारले नि पावसाने झोडले या म्हणीप्रमाणे तीआपली वाटचाल करते. असे दु:खाचे अनेक प्रसंग लेखिकेने एकाकी सहन केले. आईवडिलांना एक शब्दही सांगितला नाही. आपले दु:ख आपणच भोगले पाहिजे. आपल्या दु:खाचा स्पर्श आईवडिलांना होऊ नये याची ती दक्षता घेते. आईवडील आनंदी कसे होतील याचाच ती विचार करते. अल्पवयात तिला जाणीव आलेली दिसते.

लग्न झाल्यानंतर लेखिकेचे डी.एड. चालूच होते. लग्नानंतर तीन महिन्याने सत्यनारायण पूजा घालतात. त्यावेळी एक दिवस राहून ती नगरला निघून येते. त्याचवेळी पाथर्डीच्या एका मुलाने औरंगाबादला तिच्या पतीला सांगितले की ती कॉलेजमध्ये नसते. सिनेमाला जाते. पती लगेच तिच्या वडिलांच्याकडे येतात दोघे मिळून रेक्टर बाईंच्याकडे चौकशी करतात. त्यातील एकही शब्द खरा नसतो. खरे तर लेखिकेला साबण घ्यायचा म्हटला तर पैसे नसतात. एवढी बिकट परिस्थिती असते आणि सिनेमा वगैरे बाजूलाच राहते. ही गोष्ट तिला समजते तेव्हा ती भयंकर चिडते पुढे त्या मुलाला त्याचे वडील मार देतात तेव्हा लेखिका शांत होते. लेखिका तशी मुळापासूनच धैर्याने जिद्दीने मार्ग काढीत आली आहे. पण कितीही केले तरी सर्वातून तावून सुलाखून निघावे लागते. तिची मार्गक्रमणा तशीच आहे. 'कायेचा करीन धोंडा पण झेंडा लावीन' अशीच तिची कृती आहे.

लेखिकेचे डी. एड. पूर्ण झाल्यानंतर दिराच्या लग्नाला येते घरात खेळीमेळीने राहते. एक दोन महिन्याने माहेरी जाते मुलगा होतो. तिलाही आनंद होतो पण मुलाला पहायला सासरचे कोणी आले नाहीत म्हणून निराश होते. दीड महिन्यानंतर पती येतात. घरातील विभक्तपणाची कहाणी सांगतात. ती बेचैन होते. पुढे महिनाभराने सासरी येते.

दोघेही बेकार असल्यामुळे गोपाळ लोक नाव ठेवायचे. यांना म्युनिसिपालटित सुद्धा, नोकरी मिळते की नाही असे म्हणायचे 'निंदकाचे घर असावे शेजारी' या उक्तीप्रमाणे दोघेही गप्प बसायचे. इतर गोपाळणी सासूबाईंना मुद्दाम काहीकाही शिकवायच्या. त्यांचे ऐकून सतत घरात भांडण व्हायची. घरातील सतत भांडणामुळे वैतागून पती घर सोडून जाण्याचा निर्णय घेतात पण लेखिकेला हे मान्य नाही लेखिकेने

पतीची समजूत घालून हेही दिवस जातील निघून असे काही सागून पतीचे मन वळवले. पतीबरोबर एखादवेळी फिरायला गेली की, साबण लावून अंघोळ केली की गोपाळणी कोल्हाटीन म्हणायच्या नातेवाईकांच्या लग्न सोहळ्यात सहभागी होता येत नसे. त्यावेळी ती निराश होते पण याचा दोष कोणावर न ठेवता पतीशी न भांडता परिस्थितीमुळे असे घडते एवढी ती समजूतदार आणि विचारी आहे. या सर्व प्रसंगांना ती नेकीने तोंड देते आशावादी दृष्टीकोन ठेवून वाटचाल करते.

घरात परिस्थिती अतिशय प्रतिकूल असते. नंदेच्या दिराच्या लग्नाच्या कर्जामुळे दोन वेळेच अन्न मिळायची पंचाईत झालेली. ओढाताणीच्या परिस्थितीने अक्राळविक्राळ रूप धारण केले होते. त्याचे चटके लेखिकेने भोगले आहेत. दोघेही बेकार त्यातच हातातोंडाला आलेली म्हैस आजारी पडून मरते. दारिद्र्यात आणखीच भर पडत असते. या सगळ्यांचा विचार करून लेखिकेचे पती आजारी पडतात. मुलगा खाण्याएवढा झाला आहे पण मीठ भाकरीशिवाय काहीच मिळत नसल्यामुळे लेखिका अत्यंत दु:खी व्हायची पण अश्रू गाळण्या पलिकडे काही करता येत नसे. त्यातच मुलाला कांजण्या येतात. त्याला अडाणी समजूतीमुळे औषधोपचार करू देत नाही. 'देवीला चढ होईल' ही समजूत त्या लहान बाळाने असह्य वेदना सहन केल्या. एक दिवस असा आला की, घरात, काहीच नव्हते. मुलगा तर चहा मागायचा. त्यातच घरात कोणीच नव्हते. लेखिका शेर दोन शेर दूध घेऊन औरंगाबादचा रस्ता धरते. त्यातून मीठपीठ चहासाखर आणायची इतके दारिद्र्य. अशा दारिद्र्यात लेखिकेला दुसऱ्यांदा दिवस गेले. समाज म्हणायचा एकाला खायला मिळत नाही, दुसऱ्याला काय घालणार? हे सर्व सहन करण्यावाचून पर्याय नव्हता.

अशा दु:खात दैन्यात, दारिद्र्यात दिवस काढीत असताना मुलाखतीचे पत्र येते. मुलाखत होते. बऱ्याच लोकांना ऑर्डरस मिळाल्या. लेखिकेचे यादीत नाव नाही असे तिच्या पतीला मित्राकडून समजते. तो निराश, व्याकूळ होऊन अंथरून धरतो. आता आपणाला नोकरी लागणार नाही जीवन कसे जगायचे हा गहन प्रश्न पडून अंथरूणात अश्रू गाळत बसतो. लेखिकेला हे माहीत होताच ती त्यांची समजूत घालून तुम्ही स्वत: पाहून या म्हणते. दुसऱ्या दिवशी तो औरंगाबादला जाऊन जिल्हा परिषदेत पाहतो तर तिचे नाव यादीत असते. तो ऑर्डर घेऊन छटाकभर पेढे घेऊन अत्यानंदाने गावाला सांगतो. सासूलाही अत्यानंद होतो, नोकरी दूरच्या कन्नड भागात असते त्यामुळे काहींच्या मते जाऊ नये, पण लेखिकाला या जीवनाचा

परवडीचा वैताग आलेला असतो. कितीही दूर असली तरी तिच्या मनाची तयारी झाली होती. तिला कुटुंबाचा कायापालट करायचा होता. मुलांचे भवितव्य घडविण्याचा ध्यास लागला होता. दूरच्या डोंगराच्या गावी ती अवघडलेल्या अवस्थेत निघून जाते. प्रसूतीच्या क्षणापर्यंत नोकरी करते. तरी गोपाळ निंदा करायचे. पतीला नोकरी नव्हती. बायको कमवते नि हा हिंडून खातो, असे म्हणायचे तात्पर्य क्वचितच एखादा समाज वगळता प्रत्येक समाजात दिसून येणारी ही वृत्ती आहे. माणसाला कसे छळता येईल. त्याला कमी कसे लेखता येईल. त्याच्यात न्यूनत्व कसे सापडेल हेच शोधत असताना दिसते.

उन्हाळ्याच्या सुट्टीत पुन्हा ब्रेक मिळतो. आणखी चिंता लागते. पण थोड्याच दिवसात जवळच्या गावी ऑर्डर मिळते. अगदी धावपळ करून ती नोकरी करते. घरात शांतता राहावी म्हणून स्वत:ला कितीही कष्ट पडले तरी ती करते. पुढे वर्षभराने पतीला नोकरी लागते. ती दूरच्या गावी पतीच्या जेवणाचे हाल सुरू होतात. पुढे मुलांच्या शिक्षणासाठी ती छावणीत रहायला येते. त्याला पतीचा आणि सासूचा विरोध असतो. त्यातच काही दिवसांनी पतीला विजेचा शॉक बसतो त्यात त्यांच्या हाताचे हाड मोडते. ती छावणीत रहायला आल्यामुळे झाले असे सर्वजण म्हणतात. ऐकूण घेण्यापलीकडे काही करता येत नाही. यातून थोडेसे विसावतात तोपर्यंत तिचा ॲक्सिडेंट होतो. त्यातून ती वाचण्याची शक्यता वाटत नाही. पण त्यातूनही ती बरी होते. अशा अनेक मरणकळा भोगून ती आज शिक्षिकेचे काम करीत आहे. सुखाने जीवन जगत आहे. दु:खात सुख मानून लेखिकेचे वैवाहिक जीवन स्थिर झाले आहे. टाकीचे घाव सहन करावे ते याच अर्थाने म्हणतात. लेखिकेने ते सहन केले आहेत.

**लेखकाचे वैवाहिक जीवन :**

लहान वयातच वडिलांचे छत्र हरपते आणि कुटुंबाची सर्व जबाबदारी लेखकावर येऊन पडते. त्यामुळे सतत उपासमार होते. लेखकाला शिक्षण सोडून जनावरे राखावी लागतात. निदान पोटाचा प्रश्न तरी सुटेल. पण आई लेखकाचे शिक्षण काबाडकष्ट करून चालू ठेवते. त्याला शिक्षणसाठी प्रोत्साहन देते. आईच्या विचाराची जाणीव ठेवून लेखकाने शिक्षण अविचल चालू ठेवले. पुढे आईने आणि जातपंचायतीने लेखकाच्या लग्नाची बैठक बसवली पण लेखकाने त्याला स्पष्टपणे नकार दिला. वाळीत टाकल्याचे जीवन सहन केले पण शिक्षणाचा मार्ग सोडला नाही. पुढे बी. ए. ची परीक्षा झाला नि स्वत:च

खेर्ड्याला जाऊन बापू गोपाळाच्या मुलीशी लग्न ठरवले. त्यावेळीही गोपाळानी भांडायला सुरूवात केली. लग्न ठरविण्यासाठी पंच नेले नाहीत. लग्नाला येणार नाही. पण लेखकाने या जुन्यापरंपरेकडे गोपाळांच्या बोलण्याकडे बिलकूल लक्ष दिले नाही. इथेच लेखकाने जातपंचायतीचे वर्चस्व नाकारण्यास प्रारंभ केला. (लेखकाचे लग्न झाले पण पोटाची पंचाईत त्यातच पत्नी मॅट्रिक झालेली डी.एड.) लग्न ठरले तेव्हा मुलगी मॅट्रीक झालेली तेव्हा लेखकाने मुलीच्या वडिलांना मुलीला डी. एड. ला प्रवेश घ्यायला सांगितला. पुढे वर्षभराने त्यांचे लग्न झाले. आणि पत्नीचे डी.एड. पूर्ण केले. इथे लेखकाची शिक्षणाविषयी आस्था दिसून येते.

पत्नीचे डी. एड. पूर्ण झाल्यामुळे तिला आणावे लागणार त्यातच भावाचे आणि बहिणीचे लग्न केलेले त्याचे कर्ज होते, एकंदर परिस्थिती बिकट होती. त्यामुळे लेखक चिंताग्रस्त असतो. आता तिला माहेरी ठेवणेही योग्य नाही. त्यातच एक म्हैस आजारी पडून मरते. एम. ए. ची शिष्यवृत्ती म्हशीच्या औषधाला खर्च केली पण म्हैस हाती लागली नाही. अशी संकटांची मालिका निर्माण होते. या सर्वांचा विचार करून लेखक आजारी पडतो. उसने पैसे घेऊन दवाखाना करतो, तोच मुलाची तब्येत बिघडते. या सर्व संकटांना संयमाने लेखक तोंड देत असतो. लेखकाने परिस्थितीला सामोरे जात असताना अनेक प्रकारची कामे केली आहेत. अगदीच असह्य परिस्थिती झाली की पत्नीला आणि मुलाला खेर्ड्याला नेऊन घालवितो. पुढे पत्नीला मुलाखतीचे पत्र आले आणि तिला नोकरी लागली. थोडीशी संसारात भर पडत गेली. नि लेखकाने एम. फील साठी प्रवेश घेतला. गोपाळ समाजासाठी लेखन करणे समाजसेवा करणे हेही मार्ग स्वीकारले आहेत. या लाचार जीवनातून आता ताठ मानेने उभा आहे उद्या नोकरी लागेल अशी आशावादी भूमिका आहे. पण भटक्या गोपाळ जीवनाची भटकंती कधी संपेल याचा त्यांना वेध लागला आहे. लेखकाच्या वैवाहिक जीवनात दारिद्र्याच्या परिस्थितीमुळे असह्यवृत्तीचे दर्शन घडते. तरीही. दोन अर्धगोलाचे एक पूर्ण वर्तुळ, त्याप्रमाणे पतीचे आत्मकथन आणि पत्नीचे आत्मकथन असे भटक्या वैवाहिक जीवनाचे पूर्ण वर्तुळ (विश्व) उभे राहते. दोन्ही आत्मकथने परस्पर पूरक आहेत. 'मरणकळा' स्त्रियांचे प्रतिनिधीत्व आणि 'भटक्या' पुरूषवर्गांचे प्रतिनिधीत्व ही दोन आत्मकथने करतात. मात्र भटक्या

पण संघर्षातून सुशिक्षित बनलेल्या समाज घटकांची आत्मकथने आहेत. हे त्यांचे वेगळेपण नजरेआड करत येत नाही.

**मरणकळातील कारूण्य चित्रण :**

दलित साहित्य हे दलित वर्गाच्या जीवन व्यापारातून उद्‌भवलेले आहे. येथे असलेली वर्गव्यवस्था जातीव्यवस्थेने याने स्थिर झालेली आहे. आर्थिक शोषणाबरोबर अस्पृश्यता लादून ह्या वर्गाच्या मनुष्यपणालाच लांच्छित व्हाव लागलं आहे. त्यामुळे अनेक दु:ख वेदना, दारिद्र्य यांना सामोरे जावे लागत आहे. ह्या वेदनांचाच आविष्कार दलित साहित्यात होताना दिसतो. त्यांच्या वाट्याला आलेल्या कारूण्याचे अनुभव प्रसंग त्यात दिसतात. ''ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा''[१४] या चोखामेळ्याच्या अभंगाची आठवण होते. ऊस वाकडा असला तरी त्याचा रस गोडच असतो. ही माणुसकीची कैफीयत क्ति सत्य, सुंदर यथार्थ आहे. जन्मत:च सारी माणसं सारखीच त्यात. उच्चनीच हा भेद नाही. पण इथे मात्र माणुसकीलाच सुरुंग लागलेला दिसतो. याला पूर्णविराम मिळाला पाहिजे. कुठेतरी माणूस अस्वस्थ होऊन जागृत व्हावा, यातूनच हे अनुभवविश्व जन्माला आलेले आहे. त्यात नाना तऱ्हेची दु:खे आशा-आकांक्षा येतात. भारतीय समाजाला कल्पना करता येणार नाही असे दाहक आणि भयानक अनुभव दलित साहित्यात येत असतात. त्यातल्या त्यात 'दलित स्त्री' म्हणून होणारे अत्याचार अन्याय, एक स्त्री म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन असे भयानक अनुभव आत्मकथनात दिसतात.

'मरणकळा' ही कारुण्याने वेढलेली, फुललेली फुलत असलेली साहित्यकृती आहे. ही गोपाळ जमातीची कैफियत मांडणारी 'गोपाळ स्त्री' म्हणून आलेले कारूण्य व्यक्त होते. यांच्या वाट्याला कारुण्य येते ते भुकेच्या वेदनेतून भुकेपोटी धडधाकट असणाऱ्या आईवडिलांना आंधळे-पांगळे करावे लागते. खोटे बोलून पोट भरावे लागते. लेखिका उन्हाळ्याच्या दिवसात पाडव्याचा सण मागायला जाते. आलेली भीक पालापर्यंत येत नाही. कुत्र्याने चावा घेतल्यामुळे कुत्र्यापुढे झोळी रिकामी करावी लागते. मोकळ्या हाताने मोकळ्या झोळीने पाडवा सण उपाशी राहून, रक्तबंबाळ होऊन पाडवा सण साजरा करावा लागतो. सवर्ण आणि भटके यातील ही विषमता किती अस्वस्थ करणारी आहे. सवर्णांच्या लग्नात भीक मागायला गेले असता त्यांच्याकडून शिव्या आणि मार मिळतो. भूकेपायीच आजोबांचा मृत्यू होतो. भीक मागून शिळे,

विटलेले, बुरशी आलेले खरकटे, उष्टे अन्न मिळवताना यांचा जीव मेटाकुटीस येतो. तासनतास दारात उभा राहिल्यानंतर थोडासा भाकरीचा तुकडा मिळतो. एखादे दिवशी तोही मिळत नाही. एकदा खूप पाऊस आला. पालं पाण्याने भरले आणि भीक मागायला गेले तर एकही तुकडा मिळाला नाही. उपाशी रात्र काढावी लागते. कधी भीक मागून तर कधी अर्धपोटी, कधी फक्त पाणी पिऊन कशी उपाशी पोटी असे कितीतरी भुकेची कल्पना करता येणार नाही एवढे प्रसंग या आत्मकथनात येतात. या समाजाला युगानुयुगे असेच जीवन जगावे लागले आहे. यांच्या हाताला काम मिळत नाही त्यामुळे लाचारी जीवन जगावे लागते.

या लोकांच्या वाट्याला उपेक्षा येते. या लोकांना कोणत्याही गावात आश्रय नाही. तीन दिवसापेक्षा जास्त दिवस राहता येत नाही. त्यांच्यावर कोणतेही संकट असले, एखाद्या स्त्रीच्या प्रसूतीचे दिवस जवळ आले, दोन दिवसाची बाळंत स्त्री असली तरी मुक्काम हलवावा लागतो. लेखिका सांगते एका गावात गोपाळांना सवर्ण लोक मारतात आणि गावचा मुक्काम रातोरात हलवायला सांगतात. एका गोपाळ स्त्रीला प्रसूतीच्या वेदना सुरू झाल्या तरी तिला म्हशीवर बसवले. ''तिथच त्या मातीत, दगडात जंगलात उघड्यावर कुत्री जन्मल्यावानी तिनं एका नाजूक बाळाला जन्म दिला, आन मोकळी झाली. तिथंच उघड्यावर तीन दिस काढले. चौथ्या दिशी पुढच्या गावाला गेलो.'' अशा अत्यंत नाजूक प्रसंगी अडचणीच्या वेळी तरी त्यांचा विचार व्हायला हवा. भीक घेताना कुत्र्याच्या पंगतीत घ्यायची. मुलाला जन्म देताना रस्त्यात आडरानात द्यायचा मरतेसमयी अंत्यविधीसाठी जागा मिळत नाही, म्हणून आक्रोश करायचा नाही. अशा प्रसंगातून निर्माण होणारे कारुण्य निश्चत (सुन्न करणारे) जोड आहे. या दारिद्र्याची अन्यायाची त्यांना जाणीव आहे, पण त्यांचा नाईलाज आहे. म्हणूनच ते वाट्याला आलेले भोग (भोगवटे) सतत तुडवत आहे. सवर्णाकडून होणारे जुलूम तो भोगतो शुल्लक कारणासाठी भटक्या जमातीच्या स्त्रीची बेइज्जत करणे. मार देणे हा रिवाज आहे. लेखिकेची म्हैस गंजीवर जाताच तिला बेदम मारले जाते. जळणाची काटी घेताच लेखिकेच्या चुलतीला मारले जाते. तिच्यावर अत्याचार होतो. अशा कितीतरी संकटांना तोंड देत जीवन जगावे लागते. अंत्यविधीच्या दिव्यातून जाताना त्यांच्या प्रेताला अंत्यविधीसाठी

जागा मिळत नाही. जन्माची तशी परवड जीवन जगताना अनेक संकटे आणि मृत्यूच्यावेळी अशी दुरावस्था यांचा संपूर्ण जन्मच दु:खात व विवंचनेत जात असतो.

या गोपाळ जमातीला अन्न, निवारा यासाठी सर्वकाही सहन करावे लागते. त्याचप्रमाणे विधीसाठी दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. मुलाची पाचवी करणे हा विधी करावाच लागतो. अशी त्याची समजूत किंवा धारणा आहे. सतत हाताला काम नसल्यामुळे त्यासाठी लागणारा पैसा नसतो. पैसा नसल्यामुळे काहीवेळा विधीसाठी चोरीदेखील करावी लागते. त्यावेळी मागेपुढे न पाहता सापडल्यास शिक्षा होईल याचा कोणताही विचार करत नाहीत. विधी करणे मग कोणत्या का मार्गाने जावे लागेना. 'मरणकळा' मध्ये लेखिका सांगते''मने बोकडाशिवाय पांची चालत नाय आता ईचार पडला बोकड कसा आन कुठून आनायचा? जवळ खायला पैका न्हाय. सारे गोपाळ जमले. ईचार केला. धनगराच्या खाड्यातून बोकड चोरून आणू आन पांची दणक्यानं करूया असा नेम झाला.''[१६] ठरल्याप्रमाणे चार गोपाळ चोरी करायला जातात. एक गोपाळ साधूचे रूप घेतो आणि धनगराला बोलण्यात गुंतवतो तोपर्यंत तिघे बकरा पळवतात. पाचवीचा विधी करतात न करतात तोपर्यंत धनगर पालावर येतो आणि चुलीत पाणी ओततो. बायकांना शिव्या देतो, मारतो सगळ्या गोपाळांना गावातील लोक बेदम मारतात. चावडीवर बांधून ठेवतात. येणारे जाणारे हाती लागेल त्याने मारतात.रक्तबंबाळ करतात असे रक्तबंबाळ त्यांना सारखेच व्हावे लागते. तरीही निमूटपणे जगतात. प्रतिकार करण्याची जणू त्यांच्यात धारणाच नाही प्रथाच नाही.

अत्यंत कठीण परिस्थितीत लेखिका आजीला सोबत घेऊन खेर्ड्याला शाळेसाठी राहते. सातवीची परीक्षा झाली आणि लेखिका आजारी पडली सहा-सात दिवस ताप येऊन तिला दारापर्यंत चालण्याची शक्ती राहिली नाही. तिचे आजारपण पाहून आजी तिच्या जवळ बसून राहयची. भीक मागायला जायची नाही पण पोटात भूकेचा डोंब उसळलेला, तेवढ्यात वडील नेण्यासाठी येतात तर मुलगी आजारी. दवाखान्यात नेण्यासाठी जवळ एक पैसा नाही मग वडील सकाळी बापू सांगळ्याकडून व्याजाने दहा रुपये आणतात. त्या दहा रुपयांसाठी ते सांगळ्याच्या पायावर लोळण घेतात, रडतात तेंव्हा कुठे दहा रुपये मिळतात आणि मुलीला दवाखान्यात नेतात. तिला मोरचुदाचे दुखणे झाल्याचे डॉक्टर सांगतात. फळे

खाण्यासाठी सांगतात त्या फळासाठी वडील मोसंबीची चोरी करतात आणि भरपूर मार घेतात, ''मुसुंब तर हिस्कावले, पर बाच्या पाठीच धिर्ड केलं''[१७] पुढे वडील आजारी पडतात. खाण-पिण बंद झालेले दोन महिने झाडपाल्याचे औषध केले त्याने फरक पडेना. जवळ तर एक पैसा नाही. मग एका नवीन आलेल्या मास्तराने पाथर्डीला सरकारी दवाखान्यात जाण्याचा सल्ला दिला. दहा पैसे लागतात म्हटला. पण पाथर्डी ते खेर्डे हे तीन मैलाचे अंतर वडील कसे चाळणार उठता येत नव्हते तिथे चालणे तर खुटलेच मग लेखिका आणि तिची आई गावभर सर्वांची विनवणी करतात. तेव्हा दगडू सांगळ्याचा मुलगा रामकिसन तयार झाला आणि दवाखान्यात नेले पण सरकारी दवाखान्यात डॉक्टर घेईना. ''आखीर दाक्तराच्या पाया पडले, रडले, पण महा आवाज त्याच्या कानापातूर गेला न्हाय. त्याचे कान उघडले न्हाय''[१८] शेवटी रामकिसन सांगळ्यांच्या ओळखीने त्याच्याच पैशाने कुलकर्णी डॉक्टरकडे नेले. तोही औषध देईना, दुखणे फार मोठे आहे. माझ्याने हातात येणार नाही, पण वडील उठेना काही होऊ द्या म्हणून बसून राहिले. तेव्हा रामकिसन सांगळ्यांनीही त्यांना विनंती केली. त्यावरून इंजेक्शन केले. बाहेरची औषध लिहून दिली. त्यातून वडील बरे झाले. यात या जमातीचे अज्ञान आणि पराकोटीचे दारिद्र्य असल्यामुळे ते योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत. अज्ञानी लोकांत दारिद्र्य अवस्था असेल तर कोणीच जवळ करत नाहीत. रामकिसन सांगळ्यासारखे काही मदत-आधार देतात. त्यांच्याविषयी कृतज्ञता व आदर व्यक्त होतो. सरकारी डॉक्टरांच्याविषयी अंत:करणात राग तिरस्कार असला तरी तो व्यक्त होत नाही. याचे कारण त्यांच्या वाट्याला आलेले दारिद्र्याचे जीवन हेच म्हणावे लागेल. हा समाज सर्वच गोष्टींच्या उपभोगापासून उपेक्षित राहिला आहे. ठेवला गेला आहे.

**जातसंघर्ष :**

गोपाळ स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले अनुभव अत्यंत उध्वस्त करणारे आहेत. इतर जातीपेक्षा जाती-जातीत विरोध जास्त असतो. जातीला जात वैरी असते असे म्हटले जाते. ते योग्यच आहे. ''या माझ्या पहिल्या-वहिल्या पुस्तकानं, गोपाळ समाजात प्रचंड खळबळ उडवली. आपल्या समाजातल्या चालीरीती, रिवाज, संकेत आणि गुप्तबोली, चारचौघांसमोर चव्हाट्यावर कशाला आणली. हा माझ्यावर गोपाळ समाजाने ठपका ठेवला''[१९] या कचरू गिऱ्हेंच्या मनोगतावरून त्याची कल्पना येते.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

एखादा लेखक हा समाजामध्ये काहीतरी परिवर्तन व्हावे यासाठीच लिहित असतो किंवा अज्ञान जगाची कल्पना यावी असेही प्रयोजन असू शकते पण ते समाजाला पटत नाही. खरे तर काही एक माणूस करत असताना त्यापाठीमागे विधायक दृष्टिकोन असतो. पण त्याची जाणीव नसलेला समाज त्याला विरोध करत असतो. लेखिका शिक्षण घेते म्हणून तिला गोपाळ समाज नावं ठेवतो. तिची निंदा करतो. तिला तिच्या वडिलांना टोचून बोलत असतो.

> ''माह्या गं मैनाच्या तान्हा बाळ काखला।
> बाप्या गं गोपाळ चारी बाजून हुकला ॥
> घराच्या आतं आब्रुला नाही शिमा।
> घराच्या भाईर पडल्यानी आब्रुला लागतू धक्का ॥''[२०]

गोपाळ स्त्रिया संताप व्यक्त करणाऱ्या ओव्या म्हणतात. ह्या ओव्या ऐकून लेखिकेची आई चिंतामग्न व्हायची. पतीच्या पाठीमागे लागायची पोरीला शाळेतून काढून लग्न करा म्हणायची. पण लेखिकेचे वडील कोणाच्या निंदेकडे लक्ष न देता उलट पत्नीची समजूत घालतात. ''आग हे आपल्या भवताली कुत्री भोकतात. तोंडाकडे बघू नगं कोणी बोल्ला मंजी पचकन थुंकत जावा, आनं पुढं चालावा का आवू रडत बसलीय माही पोर चांगली शिकलं, माही पोर मास्तरीन हुईल. समज आनं शांत ऱ्हा आवू''[२१]

सगळेच गोपाळ म्हणत पोरीला शाळेतून काढ. ती भीक मागून आणेल. ती काय मुलगा आहे? ती तोंडाला काळ लावेल. डी. एड. ला गेल्यानंतर ती नगरला शिकायला गेली की दुसरेच कॉलेज करून वडिलांचे घर चालवते, असे काही म्हटले जायचे. लेखिकेची आई चिंताग्रस्त व्हायची. गोपाळांच्या जातपंचायतीने लेखिका शिक्षण घेते म्हणून वडिलांचे पाल वाळीत टाकले. वाळीत टाकणे हा त्या समाजातील भयानक प्रसंग असतो. या सर्वांचे लेखिकेने आणि लेखिकेच्या कुटुंबाने प्रहार सहन करून शिक्षण पार पाडले. दु:खाचा डोंगर पार करून ती स्थिर झाली. यशाची शिखरे जिंकायची असतील तर अशा कारूण्यप्रसंगाचा स्पर्श मनाला होऊ देता कामा नये. हेच लेखिकेच्या कारुण्य प्रसंगातून प्रकट होते. ती जर या दु:खमय जीवनाला कुरवाळीत बसले असते तर तिला शिक्षणापासून वंचित रहावे लागले असते.

प्रथम आघात सहन करावे लागतात. नंतर इच्छित घटना घडते हे त्रिकाळ सत्य म्हणावे लागेल. एका जनाबाईला बापूसारखा खंबीर वडील तसेच भेटतील असे नाही. त्यासाठी जातपंचायतीने, सवर्ण समाजाने, भटक्या जमातीने आपली मानसिकता बदलायला हवी. पारंपरिक दृष्टिकोन बदलला पाहिजे.

**'भटक्या' मधील कारुण्य चित्रण :**

ओंकार आणि चंद्राबाई या दाम्पत्याच्या पोटी गोपाळ जमातीत जन्मलेले कचरू गिऱ्हे बालपणापासून दारिद्र्य, विषमता आणि सामाजिक जुलूम यांची शिकार झाले. वडिलांचा व्यवसाय म्हशी भादरणे, डोंबाऱ्याचे खेळ करणे, भीक मागणे, आज इथं तर उद्या तिथं असे उपरे जीवन वाट्याला आलेले. या जमातीच्या वाट्याला जे कारुण्य आले ते माणसाच्या मुलभूत असणाऱ्या गरजातून अन्न, वस्त्र निवारा यांच्या गरजेतून आले.

या गोपाळ जमातीत राहण्यासाठी, वास्तव्य करण्यासाठी निश्चित ठिकाण नाही. दर तीन दिवसांनी त्यांना मुक्काम बदलावा लागतो. त्यामुळे कायमच भटकंती असते. या भटकंतीमुळे सर्वच समाज अक्षर शत्रू आहे. शिक्षणासाठी कायम वास्तव्याची नितांत गरज असते. मूळ तीच यांना नाही त्यामुळे हा समाज अत्यंत मागासलेला आहे. लेखकाला शाळेत घालताना मास्तरांनी पहिला प्रश्न हाच विचारला. आपण पालं हालवणार नसाल तर मुलाच नाव शाळेत घालतो. पालं हालवणार नाही म्हटल्यावर शाळेत नाव नोंद होते. आणि लेखकाच्या वाट्याला अनाथाचे जीवन जगावे लागते. पालांना एका ठिकाणी राहणे शक्य नसते. त्यामुळे आईवडील पोट नेईल तिकडे म्हशीच्या पाठीवर प्रपंच घेऊन भटकत असतात. अशा बालवयात आईवडील असूनही शिक्षणासाठी एकट्याने शाळेच्या व्हरांड्यात मंदिराच्या आडोशाला, अशाच मोकळ्या जागेत दिवस काढावे लागतात. जागेची ही अवस्था तर पोटासाठी भीक मागणे. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असताना लेखक शिक्षणाचा मार्ग धरतो. त्यावेळी आलेले अनुभव, अनुभवलेले, भोगलले जीवन निश्चितच कारुण्याचे आहे.

पोटाची समस्या, राहण्याची समस्या, आईवडील, भावंडे यांच्या आठवणी परक्या गावात राहण्याचा अनोळखी मुलांचा सहवास ''म्या गावाला नवखा, पोऱ्हं नवीन, मास्तर नवं सारं सारं नव नवं''[२२] या सर्वांच्यावर मात करत शिक्षणाला प्रारंभ होतो.

दु:ख कारुण्य हा आत्मकथनाचा स्थायीभाव आहे. कचरू गिऱ्हेच्या जीवनाला दु:ख एखाद्या काल सर्पाप्रमाणे विळाखा घालून बसले आहे. आज ते सुशिक्षित झाल्यामुळे दु:ख थोडेसे दूर गेलेले असले तरी त्या काळसर्पाचे फुत्कार त्यांना सतत ऐकू येत आहेत. हे अभ्यासकांनी जाणवल्याशिवाय राहत नाही. या दु:खाचा प्रपंच वैयक्तिकतेपासून सामाजिकतेपर्यंत पसरलेला दिसतो. म्हणूनच आत्मकथनामध्ये व्यक्तिमत्वाचा जिवंत प्रत्यय येत असला तरी प्रभावीपणे संबंध दलित समाजाचेच दु:ख त्यातून प्रकट होते. दलित साहित्यात दलित समाज हाच खऱ्या अर्थाने नायकपदी असतो''[२३] हे कवठेकरांचे मत योग्यच आहे.भटक्यामध्ये याचा प्रत्यय येतो. भटक्यामध्ये लेखक म्हणतो, ''हे जीवन आणखी कोणकोणत्या मार्गावरून भटकायला लावेल हे आता काळ ठरवणार इथपर्यंत मी अनेक संकटातून धडपडत आलो माझ्या भटक्या लाचार जीवनातून ताठ मानेन उभा आहे. माझ्या समाजाच्या भविष्याबद्दल तसा काळोखच आहे. एका भटक्याचं भटकणं थांबलय तरीही अख्खा समाज भटकतोय. त्यांचं भटकणं कधी थांबेल?''[२४] या लेंखकाच्या मनोगतातून समाजाचे दु:ख, व्यथा, दारिद्र्य व अवघा समाजच व्यक्त होत असतो. त्यामुळे समाज हाच केंद्रस्थानी किंवा नायकपदी असताना दिसतो. लेखकाच्या जन्मापूर्वीचा समाज या आत्मकथनात प्रकट होताना दिसतो. म्हणून आत्मकथेत समाज हा नायकपदी असतो हे निर्विवादपणे म्हणता येईल.

भारतीय समाज व्यवस्थेने या भटक्या लोकांना भटकण्याचे जीवन त्यांच्यावर लादलेले आहे. एका गावात तीन दिवसापेक्षा जास्त दिवस रहायचे नाही. लेखकाच्यावेळी आईची प्रसुती होते आणि लगेच गाव सोडावा लागतो. ज्याठिकाणी पालाचा मुक्काम असेल तेथे पाटलाकडे मुशाफिरी टिपावी लागते. पोटाच्या भटकंतीत विलंब झाल्यास अपमान, शिव्या आणि शोषण याशिवाय त्यांचा विचारच होत नाही. हनुत्या कपड्याच्या दुकानात कपडे पाहतो म्हणून दुकानदार लाथा मारतो. आणि पोलिसांच्या ताब्यात देतो. पोलिसांचा बेदम मार मिळतो. पालावर आल्यावर वादळ आणि पाऊसामुळे पालं उडून जातात. कोरडे बोटभर चिंदूक राहत नाही. कपडे ओली, जमीन ओली, अंगाला माराची ठणक आणि पोटात भूकेचा डोंब अशावेळी हुनत्या म्हणतो, ''आई रं बाबा रे नग हे जंजाळ, मरण आलं तर बर हुईल पिकीर मिटलं.''[२५] जीवनच जर इतके दु:खमय असेल तर नकोच वाटणार. गावंदरीला ओढ्यानाल्याकाठी,

माळरानावर, स्मशानात किंवा रानात ही माणसे राहतात. कुत्र्या मांजरापेक्षा वाईट जीवन जगतात. एखादी स्त्री बाळंतीण होते आणि वरून गारांसह उभा आडवा पाऊस कोसळतो एखादा म्हातारा पोटासाठी सर्पाच्या दंशाने मरण पावतो. भीक मागत असताना एखाद्या कुत्र्याने चावा घेतला. पायाचा गोळा पकडला तरी सवर्ण त्याच्या मदतीला जात नाही. अशा जीवनाचे कौतुक कसे वाटेल. असे कारुण्याने ओथंबलेले जीवन यांच्या वाट्याला आलेले असते.

गोपाळ जमातीचा म्हशी भादरणे हा धंदा या धंद्याचा मोबदला तो काय थोडेफार शिळे तुकडे, चार दोन रुपये त्यातच पाटलाची म्हैस विना मोबदल्यात भादरून द्यावी लागते. ''आमची मुशाफीरी टिपा पाटील तुमच्या पाया पडतो. मुशाफिरीत कुत्र्यासहित माणसं, जनावर सारं काही टिपलं मग मनाला गोपाळा आता मही वगार निपटून दे जा''[२६] लेखकाचे वडील आणि लेखक थोरात गवळ्याच्या म्हशी भादरून देत असताना एका अवखळ म्हशीचा शेपूट त्यांच्याकडून तुटतो हे मालकाने पाहताच भयंकर मार देतो आणि वस्तारा काढून घेतो. ''शेठ नका मारू गोपाळ मरलं सोडा त्याला सोडा.... तसा मालक धोपाटी घालायचा मनायचा माह्या म्हशीचं शेपूट तोडलं, तसा तुहेबी हात-पाय तोडीतो''[२७] असा मार घेऊन मोकळ्या हाताने पालावर यावे लागते. उपाशी राहून रात्र काढावी लागते. अशा अनेक दु:खातून संकटातून धडपडत भटके लाचार अगतिक जीवन जगत असतात.

भटक्या या आत्मकथनातील अत्यंत कारुण्याचा प्रसंग म्हणजे शाळेसाठी लेखकाला करावी लागलेली धडपड. दुसरीच्या वर्गाला सुरूवात होते. आणि संकटाची एक एक वाट तुडवत शिक्षण घ्यावे लागते. पालं पोट भरण्यासाठी दाहीदिशा निघून जातात. आई थैलीभर भीक मागून आणलेले भाकरीचे तुकडे देते. ते किती दिवस पुरणार? भीक मागायची. मुलांकडून भाकरी घेऊन कोरडीच खायची, ती मिळाली नाही तर शेतात जाऊन शेंगा-बोरे खायचे, काहीच मिळेना की नदीवर जाऊन मासे पकडून आणायचे ते खायचे अगदीच काही नसले की पाणी पिऊन भूक शमवायची एखाद्यावेळी उपाशी राहयचे. शिंदीचा गाभा खायचा लहान वयात केवढ्या दिव्यातून जावे लागते याचे आश्चर्य वाटते.

एखाद्याचा मृत्यू जवळ आला तरी भीक, डोंबाऱ्याचा खेळ करावा लागतो. लेखकाच्या मामाचा मुलाचा डोंबऱ्याचा खेळ चालला असताना त्याच्या आईला तो खेळ करावाच लागतो. तोपर्यंत

लेखकाच्या मांडीवर मुलाचा प्राण जातो असे मरणप्राय प्रसंग अस्वस्थ करणाऱ्या जीवनाच्या साथ संगतीने जीवन जगत असतात.

शिक्षण घेत असताना अनेक दु:ख कारक घटनांना लेखकाला सामोरे जावे लागते. वडिलांचा मृत्यू, वडिलांच्या प्रेताला जागा न मिळणे, वडिलांची दाढी उतरली नसल्यामुळे गोपाळ प्रेताला हात लावत नाहीत. जेवण आणि दारू देण्याचे कबुल केल्यानंतर वडिलांचा अंत्यविधी, वडील वारल्यामुळे गोपाळ आईला नावं ठेवतात. "रंडक्या बायकाला कोणाचा धाक नसतो जिच्या गळ्यात मणी तिला धनी"[२८] असे काही काही म्हणायचे, कान असून बहिरे व्हावे लागे, एक एक शब्दांचा प्रहार सहन करावा लागे.

गोपाळ समाजात जातपंचायतीचे प्रस्थ महाभयंकर असते. त्यामुळे काहींच्या वाट्याला दु:ख अपमान, छळ, अन्याय, यासारखे कारुण्याचे प्रसंग येत असतात. भावकीच्या लग्नात जातपंचायतीची बैठक बसते एक गोपाळ पत्नीला काडीमोड मागतो जातपंचायत पतीच्या बाजून निकाल देते मुलीचे पत्नीचे वडील गयावया करतात. ती हंबरडा फोडते. शेवटी वेडी होऊन मरण पावते.

माणसाच्या जीवनात निरंतर अशी कोणती गोष्ट असेल तर कधीच न संपणारी भूक. या भुकेतून व्यथा, वेदना आणि अगतिका या सर्वामधून मुक्त होण्याची चाललेली निर्व्याज धडपड याचा प्रत्यय येतो. या धडपडीत आक्रमक भूमिका त्याने कुठेच घेतलेली नाही. कुठेही उरबडवेपणा आणि आक्रस्ताळेपणा आढळत नाही. अंतर्बाह्य संघर्षात उभे राहून संयमाने एकएका करुण प्रसंगाला सामोरे जातात.

**लेखक लेखिकेच्या आत्मकथनातील वाङ्मयीन अंग :**

'मरणकळा' या साहित्यकृतीची नायिका एका भटक्या दलित गोपाळ जातीतील आहे. सवर्णांनी सर्व सुधारणेपासून दूर ठेवलेल्या उपेक्षिल्या गेलेल्या समाजाची आहे. ही नायिका कळायला लागताच प्रौढत्वाचे भान आलेली, व्यक्तिमत्व विकासाच्या ओढीने भारलेली आहे. नवजीवनाची स्वप्ने पाहणारी आहे. ज्या जातीत आपण जन्मलो तिच्या अज्ञानाने दुबळेपणाने संकुचीत वृत्तीने ती अतिशय व्यथित होते. पण तिला जातीची घृणा येत नाही. गोपाळ जमात, जातपंचायत, विषमतेची वागणूक असह्य करणारी भूक वास्तव्याची कोणतीच सोय नसलेली अशा अभावाग्रस्त जीवनाशी झगडत-झगडत संघर्ष करत शिक्षण

घेते आणि समाजात ताठ मानेने उभी राहते. हे सारे चित्रण लेखिकेने प्रभावीपूर्ण रितीने केले आहे. म्हणूनच हे आत्मकथन अधिक धारदार जिवंत व परिणामकारक वाटते.

**नाट्यपूर्ण घटना प्रारंभ :**

अनेक घटना प्रसंग नाट्यपूर्णरितीने योगायोगाचा वापर न करता वास्तवपणे मांडले आहेत. योगायोगाचा, काल्पनिकतेचा स्पर्श न होताही परिणामकारक नाट्यपूर्ण वाटतात. जे भोगले. जगले आहे तेच व्यक्त केले आहे. लेखिकेला शाळेत घालताना आई विरोध करते म्हणून वडील आईला बेदम मारतात "गोपाळनीची पाठ का सुजून टाकली."[२९] शाळा बुडवून भीक मागायला जाते म्हणून वडिलांचा मार, सवर्णांच्या मुली शेजारी बसू देत नाहीत, मुलगी शिक्षण घेते, म्हणून गोपाळणी दम देतात. शाळा सोड म्हणतात, जातपंचायत वडिलांचे पाल वेगळे टाकते. ऐन मॅट्रीकच्या वर्षी वडील आजारी पडतात. मॅट्रीक नंतर डी. एड. ला प्रवेश घेतल्यानंतर गोपाळ निंदा करतात. लग्न झाल्यानंतर एका मुलाने खोटेच सांगून पतीच्या मनात संशय, घरात मुलाला वळण लावत असताना सासूचा जाच, नोकरी नसल्यामुळे गोपाळ समाज अपमानकारक निंदा करतात, पतीला विजेचा शॉक, लेखिकेचा ॲक्सिडेंट अशा अनेक नाट्यपूर्ण घटनातून जनाबाईच्या दु:खाची तीव्रता अधिकाधिक टोकदार होते. त्यामुळे ही आत्मकथा तटस्थपणे वस्तुनिष्ठ निवेदनातून साकारली आहे. "दलितांच्या दु:खाला कारणीभूत झालेली ही समाजव्यवस्था आणि लोकाचार यांचे दर्शन दलितांच्या आत्मकथनातून घडते."[३०] हे वासुदेव मुलाटे यांचे म्हणणे अगदीच समर्पक वाटते. कारण या दलितांवर समाजव्यवस्थेने लादलेले भटकणे त्यामुळे व्यापक असणारी भूक, अस्पृश्यता मानणारे लोकाचार यात सवर्ण आणि ज्या विशिष्ट जातीत ती व्यक्ती जन्माला आलेली असते. या दोहोंतून त्यांना तीव्र दु:खास सामोरे जावे लागते. हे घटना प्रसंग वेगाने घडत जाणाऱ्या मरणयातनांची मालिका उभी करतात. तरीही दाहक भयानक दु:खातून वाट काढत शिक्षण पूर्ण करून नोकरी करू लागते. आत्मकथनाचा शेवट सुरुवात होतो त्यामुळे अधिकाधिक धारदार व जिवंत आणि वास्तव अशी दीर्घकथा वाटते.

**प्रत्येक प्रकरणा अखेरी साकळून येणारे लेखिकेचे सारभूत विचार :**

प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी जीवनातील घटनांचे सार प्रकट केलेले दिसते. ''सागरगोट्याच्या पानाआड दूर दूर रानात ढोल वाजत हुता''[३१] येथे लेखिकेची भाषा काव्यात्म होते. तसेच एक पारंपारिक पिढी समाप्त होते आणि लेखिकेच्या शिक्षणाला प्रारंभ होतो. ''घनघोर काळोखातून एक प्रकाशाची ठिणगी मोठी होत उजळत हुती. केळकरबाईच्या मायेच्या सावलीत मनाला पंख फुटल्यागत वाटतं हुतं''[३२] शिक्षणाला प्रारंभ होऊन केळकरबाई विषयी कृतज्ञता, आदर व्यक्त करताना लेखिकेत एक नवीन जिद्द प्राप्त होते. अशा पद्धतीने प्रत्येक प्रकरणाचा शेवट हा फक्त उमगलेले प्रत्यक्षात आणलेले तत्व व्यक्त होताना दिसते. एखाद्या श्रेष्ठ अनुभवी लेखकाप्रमाणे त्यात छटा व्यक्त होतात. सत्य, वास्तव आणि जिवंत प्रसंग यांना वाङ्मयीन घटकांनी समर्पक अशी जोड दिलेली दिसते. जीवनात भोगलेल्या दु:खानी ती घायाळ होत नाही तर सावध होते. 'समाजाचा, परिस्थितीचा विरोध असताना प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर शिक्षण घेतले त्या शिक्षणासाठी संघर्षाची गाथा म्हणजे हे आत्मकथन आहे.''[३३] असे 'मरणकळा' विषयी म्हटले आहे ते उचितच आहे. याचा प्रत्यय 'मरणकळा' या आत्मकथनाच्या शीर्षक योजनेत येतो. शीर्षक योजना जीवनामध्ये जिवंत असतानाच अनेक मरणप्राय यातनाना लेखिकेला सामोरे जावे लागते. वडिलांच्या पाठिंब्यामुळे जनाबाईच्यापुढे निश्चित असे ध्येय निर्माण होते. ते पार पाडण्याचा आत्मविश्वास तिच्याजवळ आहे. आत्मभान, अकालीच प्रौढत्वाची जाणीव या सर्वामुळे ती परिस्थितीशी संघर्ष करत जीवनाला सामोरे जाते. एक शिक्षिका होते. ही वाटचाल करत असताना दाहक व भयानक दु:ख तिच्या वाट्याला आलेले आहे. ते कधी सामाजिक भुकेतून तर कधी नियतीकडून. या सर्व मरणकळा सहन करते त्यामुळे डॉ. लुलेकरांचे मत यथार्थ वाटते. तसेच शीर्षक योजना मार्मिक आहे. हे या आत्मकथनाचे एक वाङ्मयीन वैशिष्ट्ये आहे.

**प्रत्ययकारी वास्तव :**

सामाजिक जीवनाचे, दलित म्हणून मिळालेल्या वागणूकीचे ताण-तणावाचे द्वेष मत्सर, रूढी, परंपरा, दारिद्र्य यांचेही अत्यंत प्रत्ययकारी चित्रण 'मरणकळा' तून प्रकट होताना दिसते. म्हणून एक वैशिष्ट्यपूर्ण आत्मकथन-एक यशस्वी साहित्यकृती ठरते. गोपाळ समाज हा सतत भटका आहे.

भटकेपणामुळे हाताला काम मिळत नाही. त्यातून निर्माण होणारे दारिद्र्य, भूकेसाठी सतत करावी लागणारी भटकंती, अशा चक्रात अडकलेला गोपाळ समाज, त्यातच भटके जीवन असल्यामुळे गावात प्रतिष्ठा नाही. त्यांच्या जीवनाचा कधी विचार होत नाही. दारिद्र्य आणि अस्पृश्यता सतत बरोबर असलेली लेखिका आईवडिलांना एकटीच असल्यामुळे गोपाळ जमातीतील स्त्री-पुरूष यांच्याकडून तिरस्कार केला जात असे. ''सपाट पाठीची, हिच्या पाठीवर लेकरूबाळ काय हुत न्हाय. आन आमच्या दोर्घीनलाबी कोणी बर बघत नव्हत''[३४] मुलगी शिक्षण घेते म्हणून वडिलांचे पाल वेगळे टाकले जाते, नवीन कोणी काही केले की वाळीत टाकण्याची रूढी परंपरा गोपाळ समाजात असते. अशा प्रसंगाचे प्रत्यकारी वर्णन केलेले आहे. शिक्षण घेत असताना गोपाळ समाजाने छळ केला; पण सवर्ण समाजातील काही व्यक्तींनी प्रोत्साहन पाठिंबा दिला सहकार्य केले पाटलाने शिक्षणाचा मार्ग दाखवला. मास्तराने प्रोत्साहन दिले. आसाराम माळ्याने आश्रय दिला. केळकरबाईनी माया दिली, मेहंदळे मास्तर पती-पत्नीनी सवलतीची जाणीव करून दिली. गावकऱ्यांनी वर्तणुकीविषयी सत्य असेल ते प्रकट केले अशा व्यक्तीविषयी कृतज्ञता भाव स्पष्ट होतो. त्यामुळे हे आत्मकथन सत्य, जिवंत आणि परिणामकारक अशी कहाणी वाटते. एकांगीपणाचे दु:खच व्यक्त होत नाही तर ऋणानुबंधसुद्धा व्यक्त होता.

**गोपाळांचे भाषिक सौंदर्य:**

'मरणकळा' मधून आपले अनुभव प्रकट करताना गोपाळ समाजात बोलल्या जाणाऱ्या भाषेचे प्रतिबिंब पडताना दिसते. यामुळे या भटक्या जमातीतील अनुभव प्रकट करताना त्याचे अर्थ वैभव वाढते. तो अनुभव अधिक समृध्द आशयासह प्रकट होतो. यात नाठीबा (मराठी) पाऱ्याचा (कबुतरे) चीस झालं बॉ (चांगल झाल) मेढरं सोसपोडा (मेंढरु सोडा) बंद ठाला ते (भूत होय ते) खडपन कीरबा (पडण) ठोणूक (लाकूड) अशा त्यांच्या शब्दांचा समावेश होतो.

'मरणकळा' आत्मकथनाला प्रारंभ बोलीतून होताना दिसतो. पोरी तीन दिसा उपर एकाच गावात राह्याला मुभा नव्हती. ज्या गावात चारा पाणी दिसंल आणि आम्हाला घासकुटका मिळण्यासारखं गांव दिसंल ह्याच गावाजवळ पालं ठोकायची, उपटायची ठोकायची तुझ्या आज्याला भारी कंटाळा [३५] आणि याच आत्मकथनाच्या शेवटी शिकून सुशिक्षित, सुसंस्कृत झालेली जनाबाई रेखाटताना ती लिहिते ''शेत

तुडवीत आलो होतो. तसेच पुन्हा शेतं तुडवीत तुडवीत पुन्हा निघालो. गेलो मातीजवळ तेथे चार-पाच सेंदरू लावलेली दगडं होती. कोणता दगड म्हाताऱ्याचा हे त्यांनाही समजेना --- ह्दय दाटून आलं नि आपोआप डोळ्यातून अश्रू दाटू लागले. हे बघून पुन्हा पुन्हा जुन्या आठवणी जाग्या होत होत्या. जिथ मेला तिथंच टाकला. त्याची जगानं पर्वा करू दिली नाही. या क्षणी मला माझ्या आजोबाच्या मरणाची आठवण झाली.''[३६] प्रारंभ आजोबाच्या आठवणीने होतो आणि शेवटही आजोबाच्या आठवणीने होतो. प्रारंभ बोलीतून तर शेवट प्रमाण भाषेतून होताना दिसतो. हे लेखिकेच्या लेखनाचे कौशल्य जाणवते. जनाबाईच्या भाषेवर ग्रामीण बोलीचा प्रभाव आहे. स्त्रीमनाची वेदना आविष्कृत करणारी भाषा त्यांच्या आत्मकथनाला लाभली आहे. अतिशय साधी सरळ भाषा आल्याने या भाषा शैलीतून अनुभव प्रभावी परिणामकारक ठरतात. या निवेदनाला कथनाचे रूप प्राप्त होते. छोट्या छोट्या वाक्यातून प्रसंग व्यक्त होतात, ''असचं जांभळी नावाचं गांव हुतं. गावाच्या भाईर नदी आन त्या नदीच्या काठावर वडाची झाड हुती''[३७] ''आसाच एक प्रसंग आजी आजारी हुती''[३८] अशा छोट्या छोट्या वाक्यातून अनुभवांचे निवेदन केले आहे. आठवणींच्या साळखीने विणली गेलेली जीवनकथा व्यक्त होते.

ग्रामीण बोलीतून सहजपणे अनेक वाकूप्रचार आणि म्हणी यांचा अर्थपूर्णतेने वापर होतो. 'मरणकळा' मध्ये म्हणी ना हाक ना बोंब, आब्रुचं खचतं बिना आब्रुचं पोसतं, जित्याची खोड मेल्याविना जात नाही, भित्यापोटी ब्रह्मराक्षस, जीवाची सागुती होणे, कुत्र्यावाणी हाल होणे, धडकी भरणे, पोटात आग पडणे, पाठीच घिर्ड होणे अशा किती तरी म्हणी आणि वाकूप्रचारांचा यात समावेश होतो.

**गोपाळ समाजातील प्रतिगामित्व:**

लोकजीवनला प्रसन्न करणाऱ्या लोकगीतांचा वापर या आत्मकथनातून झाला आहे. लोक जीवन, संस्कृती, लोकमनाचे भावबंध यातून प्रकट होतात. स्त्री मनाची स्पंदने व्यक्त करणारी लोकगीते आली आहेत. जातं ही स्त्रियांची खरी सोबतीण असते. जात्यावर बसताच ती मनातील सुखदु:खाचे हितगुज सांगते. गोपाळणींनी जात्यावर दळताना म्हटलेले गीत

'माहिं गं मैना, घरादाराची शोभा

कोण गं कोल्हाटीन बाजारात उभा ॥१॥

माह्यागं घरात, दरवळला वास,

जाती मंगाच्या कोण्या गं रांडांना केला वनवास ॥२॥

लोक या जनमखी, तिला टोपल्यात ठिवा।

दावू नकंगा ईला उडत्या सुखाची हवा ॥३॥

अशा लोकगीताबरोबरच लेखिका शिकते हे गोपाळणींना अमान्य आहे. तिला पाहून त्या गाणं म्हणायच्या,

तान्ह्या बाळू माह्या कानड्या लेकीला।

हिंडण फिरणं, वाटाच्या कोल्हाटनीला ॥

माह्य गं मैनाच्या, तान्हा बाळ काखला।

बाप्या गं गोपाळ, चारी बाजूनं हुकला ॥

घराच्या आत आब्रुला नाही सीमा।

घराच्या भाईर पडल्यानी, आब्रुला लागतू धक्का ॥''[३९]

जनाबाई आणि तिच्या वडिलांना पाहून म्हटलेले हे लोकगीत लोकमानस व्यक्त करते. म्हणूनच हे आत्मकथन अर्थपूर्ण वाटते.

माणसाच्या जडणघडणीत तो ज्या प्रदेशात ज्या परिसरात जन्मला वाढला त्याचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यकृतीत पडते. तेथील परिसर, संस्कृती, निसर्ग, हवामान, पिकपाणी, रीतीरिवाज, परंपरा, वेशभूषा, आवड-निवड, आचार-विचार, सण उत्सव, यात्रा जत्रा, लोकसमजुती लोकभ्रम, अंधश्रध्दा इ. चा आंतर्भाव होत असतो. 'मरणकळा' मधून अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्याचा भाग, बीड जिल्ह्याचा भाग, नंतर औरंगाबादकडील भाग चित्रित झाला आहे. ''दलित आत्मकथनामधून प्रादेशिकता ही त्यांच्या पूर्ण रूपाअरूपासह प्रकट झालेली आहे''[४०] हे म्हणणे अगदीच योग्य आहे. लेखक ज्या प्रदेशात राहतो त्याचा प्रभाव त्याच्या व्यक्तिमत्वावर पडत असतो. प्रदेश हा त्याच्या व्यक्तिमत्वाचा विशेष असतो. म्हणूनच आत्मकथन वास्तव ठरत असतात. तेथील दसऱ्याचा सण, मढीची यात्रा, तेथील भाषा यातून मरणकळाची प्रादेशिकता प्रकट होते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**मरणकळाचा मुखडा (बाह्यांग):**

'मरणकळा'या आत्मकथनाचे वाड्.मयीन वैशिष्ट्ये म्हणजे साहित्यकृतीची शीर्षक योजना 'मरणकळा' हे नऊ विभागात निवेदन केले आहे. पहिल्या शीर्षकातून गोपाळ समाजाची पार्श्वभूमी प्रगट होते. ढोल या वाद्यावर जीवन जगणारा समाज. हा ढोल सागर गोट्याच्या पानाआड दूर जातो आणि लेखिकेच्या शिक्षणाला प्रारंभ होतो. दोन ते सात या प्रकरणात लेखिकेने शिक्षणासाठी केलेली धडपड अनेक संकटांशी संघर्ष संयमाने केलेली वाटचाल आणि लग्न होते या अनुभवांना अनुसरून शीर्षक योजना केली आहे. आठव्या प्रकरणात नोकरी लागते 'निश्चायचं फळ' मिळते जन्मापासून निश्चायचं फळापर्यंत अनेक मरण वेदना मरणयातना चे गाठोडे हृदयात साठवून 'मरणकळातून' अभिव्यक्त होते. अशा या 'मरणकळा' तून 'मरणकळा' हे शीर्षक दिले यात लेखिकेच्या चिंतनशील अभ्यासू काव्यमयवृत्तीचा प्रत्यय येतो. मुख्य शीर्षक आणि उपशीर्षक ही अत्यंत मार्मिक आहेत कुठेही औचित्य भंग झालेला नाही. म्हणूनच 'मरणकळा' हे अधिक परिणामकारक वाटते.

**'भटक्यां'चे वाड्.मयीन अंग:**

कचरु ओंकार गिऱ्हे हे मराठीतील एक आत्मकथनकार. तसेच त्यांनी 'गोपाळ समाज: इतिहास आणि परंपरा' हे गोपाळ जमातीची माहिती देणारे पुस्तक लिहून प्रसिध्द केले आहे. त्याचप्रमाणे 'गोपाळ समाजाची जातपंचायत' या विषयावर शोधनिबंध सादर केला आहे. त्यामुळे ते एक लेखक व चिकित्सक अभ्यास करणारे म्हणून परिचित होतात. 'भटक्या' आत्मकथन लिहून त्यांनी 'स्व'ची आणि अवघ्या गोपाळ समाजाची कैफियत मराठी साहित्यात मांडलेली आहे.

या आत्मकथनात कचरु गिऱ्हे यांना कळायला लागल्यापासून ते एम.फील. पर्यंतचे शिक्षण होईपर्यंत जे जीवन जगले, भोगले, अनुभवले, पाहिले ते अत्यंत प्रामाणिक प्रांजळपणे मांडले आहे. निवेदन केले आहे . त्यांच्या लेखनात कुठेच आक्रस्ताळेपणा किंवा संताप जाणवत नाही. पाटील मुशाफिरी नोंदवताना लेखक जवळ असतो. पाटील अपमानास्पद बोलतो. वडील पाटलाच्या पायावर लोळण घेतात. तरी तेथे प्रतिकार किंवा संताप व्यक्त होत नाही. व्याकुळताच व्यक्त होते. ते लिहितात ''जणू काय

आमच्या जमातीला जगात कुठच थारा नाही. पाखराला तरी थारा मिळतो पण आमाला कुठचं जागा न्हवती''[४१] असे अत्यंत संयमाने आपले अनुभव मांडले आहेत.

गोपाळ जमात सर्व समाजापासून सर्वच बाबतीत उपेक्षित असलेली जमात आहे. 'भटक्या' आत्मकथनाचा नायक कचरु गिऱ्हे हे आहेत. त्यांनी शिक्षणासाठी वाटेल ते कष्ट घेऊन परिश्रम करून उच्चशिक्षण घेतात. हे शिक्षण घेताना व्यक्तिगत पातळीवर, कौटुंबिक पातळीवर, समाजाच्या पातळीवर नानाविध पध्दतीची संकटे आली. त्यांना न जुमानता शिक्षणासाठी कष्ट उपसत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्या कडवट अनुभवाने गोपाळ जमातीच्या स्थितीगतीचा परिस्थितीचा आलेख काढलाआहे. जीवनात आलेल्या दु:खाने ते कोसळत नाही तर संयमाने अबोलपणे तोंड देत राहतात. वडील शिक्षणाला विरोध करतात. शिवीगाळ व मार देतात ते निमूटपणे सर्व सहन करत पण शिक्षणाचा मार्ग सोडत नाहीत. शिक्षणाने बदल होतो हे त्यांनी लहानपणीच जाणले होते, ''शाळाची संगत जडली थोडी तरी जिवाची वणवण थांबली''[४२] या साऱ्या विचारमंथनातून एक समजूतदारपणा जाणवतो. यातून नायकाची जिवंत परिणामकारक व्यक्तिरेखा प्रकट होते.

**निवेदन कौशल्य:**

'भटक्या'मधील निवेदनाला लेखकाच्या जन्माने प्रारंभ होतो. जन्माचे विदारक सत्य वडील त्याला सांगत असतात. जन्मापासून दारिद्रयाचे वरदान मिळालेला लेखक शिक्षणासाठी अनेक प्रकारचे कष्ट करतो. दारिद्रयाचे अनेक अनुभव व्यक्त होतात. तसेच गोपाळ समाजाला भयानक जीवन जगावे लागते त्याचे प्रसंग येतात. या सर्वांचे निवेदन लेखक कोरडेपणाने करतो. पण एखादी घटना प्रसंग फक्त शब्दबध्द होताना दिसते, त्यामुळे निवेदन ऐतिहासिक लेखनाप्रमाणे हकीकतीच्या पातळीवर राहते असे वाटते. घटना प्रसंगातील विविध पदर असतात ते उलगडून दाखवले जात नाहीत. त्यामुळे रसहानी होते. ''एकदा आजोबा घोरपड धरायला जंगलात गेला होता. भोसक्यात हात घालताच घोरपड मून काळा डोंब्या नाग आजोबाच्या हाताला आला. आन तिथेच तो तडफडून मेला. आण त्याला पाणी मागू दिलं न्हाय त्या सापानं''[४३] असे मोजक्या शब्दामध्ये सांगून जातात. त्याठिकाणी कारुण्याचा, भुकेचा प्रश्न, दारिद्रय याचा कुठेही स्पर्श होत नाही. अशा मितभाषी योजनेमुळे जो जोरकसपणा, धारदारपणा, परिणामकारकता निर्माण

व्हायला हवी ती होत नाही. खरे तर हे घटना प्रसंग त्यांनी भोगलेले, अनुभवलेले, पाहिलेले आहेत. पाल्हाळीक होऊ नये असे वाटत असले तरी त्यातील भयानकता ही व्यक्त झाली पाहिजे. तसेच सहसा उपमा प्रतिक योजना यात संयम किंवा अल्पत्व दिसून येते, ''मव्हा डोकं नर्मदाच्या दगडासारख असायचं''[४४] अशा क्वचित ठिकाणी उपमा येतात. आई आणि वडिलांची व्यक्तितेखा उठावदार आणि आत्मियतेने रेखाटली आहे. हनुत्या, शंकरकाका, विष्णू, छगन्या इ. व्यक्तिरेखा निमित्तमात्र येताना दिसतात. त्यांच्याविषयी आदर आहे.

**नाट्यपूर्ण प्रसंग:**

अन्न, वस्त्र, निवारा, अस्पृश्यता यातून नाट्यात्म प्रसंगाचे दर्शन घडते. दर तीनदिवसाला गाव बदलावे लागते. पावसाळ्याच्या दिवसात बसून रात्र काढावी लागते. भूकेसाठी भीक मागणे भीक मागत असताना सवर्णाकडून शिव्या मार, भुकेसाठी प्राणास मुकणे, भुकेपायी शेतातील शेंगा कणसे बोरे यांची चोरी करणे, ती सापडल्यास रक्तबंबाळ होणे. ''दलितांच्या अभावग्रस्त जीवनात भूक ही रौद्र स्वरुपात आढळते''४५ हे वासुदेव मुलाटे यांचे मत योग्य वाटते. पोटाच्या भुकेसाठीच त्यांचे आयुष्य जात असते. याही आत्मकथनात भुकेच्या प्रसंगातूनच तीव्र दु:ख अभिव्यक्त होताना दिसते. भुकेसाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून नाट्यात्मकता व्यक्त होते.

**भाषाशैली:**

मरणप्राय दु:खाला आणि संकटाला सामोरे जाणारे जीवन चित्रित करताना त्या अनुभवांना अभिव्यक्त करणारी भाषाशैली अत्यावश्यक ठरते. त्याविना आत्मकथनांतील प्रसंगाचे, घटनांचे प्रत्ययकारी आणि जिवंत चित्रण होत नाही. औरंगाबाद, गोलवाडी, गुंजलवाडी, माटेगाव, शादलवाडी, खुलताबाद, बीड, परंडा, खेर्डे या परिसरातील बोली भाषा या आत्मकथनात विशेषत: आलेली आहे. प्रसंगानुरूप भाषा, गोपाळ या भटक्या विमुक्त जमातीची खास बोली भाषा आलेली आहे. त्यातील शब्दसंपदेमुळे मराठीच्या अर्थवैभवात भर पडते. मारवीन निझर लेका म्या निझरलो (बाई गेली का गेली) बंबई झोपली (फार वाईट झालं) मळीव (चारित्र्यहीन) मरळी निझराया लागले (लोक जायला लागले) असे खास गोपाळ बोलीतील शब्द येतात. आशय अर्थपूर्ण करणाऱ्या म्हणीचा वापर केला आहे. 'दहा

गेले पाच राहिले' जिच्या गळ्याला मनी तिला धनी 'शिकला तितका हुकला' ज्याच्या धनी नाई पास त्याच्या कुलवाडीचा नासं यासारख्या म्हणी आल्या आहेत. उताणा पडणे, लाथ मारणे, पाया पडणे, डंख मारणे, मिटवामिटव करणे यासारखे वाक्‌प्रचार इचार, निंबूर, आब्यास, उदोग, समदे, ईव्हळत, परसंग, जवारी, डोस्क, रघत, वढा, कोरड्यास, यासारखे अनेक ग्रामीण बोलीतील शब्द आले आहेत. लेखकाने प्रारंभापासून शेवटपर्यंत निवेदन भाषा ग्रामीण बोलीभाषाच वापरली आहे. असे जरी असले तरी त्यांच्या भाषेमुळे मराठीच्या शब्दसंग्रहात मोलाची भर पडते हे नजरेआड करता येणार नाही. गोपाळ जीवनातील वाक्‌प्रचार म्हणी, शब्द यामुळे मराठीच्या वैभवात वृध्दीच होईल असे वाटते.

**संदर्भ:**


| | | | |
|---|---|---|---|
| १. | मरणकळा | : | लेखक - जनाबाई कचरु गिऱ्हे, प्रकाशक - सौ. नंदिनी तु. गवळी, ५१३ ब प्लॉट नंबर ४/अ, नलवडे कॉलनी, सम्राटनगर, सागरमाळ, कोल्हापूर, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती जुलै १९९२, पृ.९. |
| २. | दलित साहित्य : एक अभ्यास | : | लेखक - अर्जुन डांगळे, प्रकाशक - सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९७८, पृ. १४८. |
| ३. | दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र | : | लेखक - डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रकाशक - कांता प्रकाशन, बार्शी, प्रथमावृत्ती, १७ ऑगस्ट, १९९६, पृ. ७५. |
| ४. | मरणकळा | : | पृ.५१ |
| ५. | तत्रैव | : | पृ. २२ |
| ६. | भटक्या | : | लेखक - के.ओ. गिऱ्हे, प्रकाशक - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९१, पृ.७१. |
| ७. | तत्रैव | : | पृ. ७२ |
| ८. | तत्रैव | : | पृ. ६६ |
| ९. | तत्रैव | : | पृ. ६७ |
| १०. | तत्रैव | : | पृ. ५५ |
| ११. | तत्रैव | : | पृ. ५५ |
| १२. | तत्रैव | : | पृ. १८ |
| १३. | तत्रैव | : | पृ. ५७ |
| १४. | संतांची अभंगवाणी | : | लेखक - संपादक - डॉ. एस.एस. भोसले, डॉ. ल.का. मोहरीर, प्रकाशन - किर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. ८५. |
| १५. | मरणकळा | : | पृ. १९ |
| १६. | तत्रैव | : | पृ. १९ |
| १७. | तत्रैव | : | पृ. ३६ |
| १८. | तत्रैव | : | पृ. ४४ |
| १९. | भटक्या | : | पृ. ५ मनोगत |
| २०. | मरणकळा | : | पृ. ४१ |
| २१. | तत्रैव | : | पृ. ६५ |
| २२. | भटक्या | : | पृ. २७ |

२३. दलित साहित्य : एक आकलन : लेखक - बाळकृष्ण कवठेकर, प्रकाशक - अजब पुस्तकालय, कोल्हापूर प्रथमावृत्ती - जानेवारी, १९८१, पृ. ८१.

२४. भटक्या : पृ. ८१

२५. भटक्या : पृ. २१

२६. तत्रैव : पृ. ३५/३५

२७. तत्रैव : पृ. ३३

२८. तत्रैव : पृ. ५६

२९. मरणकळा : पृ. २५

३०. दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप : लेखक - डॉ. वासुदेव मुलाटे, प्रकाशक - स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी, १९९९, पृ. ६६.

३१. मरणकळा : पृ. २४

३२. तत्रैव : पृ. ३७

३३. वेदनांचा प्रदेश : लेखक - डॉ. प्रल्हाद लुलेकर, प्रकाशक - कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, मार्च २०००, पृ. २१४.

३४. मरणकळा : पृ. २१

३५. तत्रैव : पृ. ९

३६. तत्रैव : पृ. १०२

३७. तत्रैव : पृ. २१

३८. तत्रैव : पृ. १३

३९. तत्रैव : पृ. ४१

४०. दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप : लेखक - डॉ. वासुदेव मुलाटे, प्रकाशक - स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ६९.

४१. भटक्या : पृ. ३५

४२. तत्रैव : पृ. २९

४३. तत्रैव : पृ. १७

४४. तत्रैव : पृ. २९

४५. दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप : लेखक - डॉ. वासुदेव मुलाटे, प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ५३.